# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०५ // दि. ३०/११/२०१८ तहकूब महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि. ०७/१२/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ३०/११/२०१८ शुक्रवार रोजी तहकूब करणेत आलेली महासभा दि.०७/१२/२०१८ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या तहकूब महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | पाटील प्रतिभा सुधीर | सोनार रंजना विजय |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे मयुर चंद्रकांत | खडके सुनिल वामनराव |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | खडके विश्वनाथ सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुडलिक | भंगाळे विष्णु रामदास |
| खान रुकसानाबी गबलु | बारी शोभा दिनकर | सोनवणे राखी शामकांत |
| सोनवणे कांचन विकास | शेख हसीनाबी शरीफ | तायडे ज्योती शरद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील कुलभुषण विरभान | लढढा नितीन बालमुकुंद |
| शिंदे गायत्री उत्तम | भिल पार्वताबाई दामु | बरडे नितीन मनोहर |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील उषा संतोष | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सपकाळे मिना धुडकु | कोल्हे ललीत विजय | महाजन सुनिल सुपडू |
| कोळी दत्तात्रय देवराम | राणे गायत्री इंद्रजित | महाजन जयश्री सुनिल |
| सपकाळे रंजना भरत | तायडे सुरेखा नितीन | नाईक प्रशांत सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| सनकत चेतन गणेश | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| सोनवणे भारती कैलास | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी चेतना किशोर | पाटील रेखा चुडामण | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे मुकुंदा भागवत | सोनवणे सुरेखा सुदाम | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे अमित पांडुरंग | ढेकळे सदाशिव गणपत | शेख सैईदा युसुफ |
| चौधरी मंगला संजय | पाटील राजेंद्र झिपरु | **स्विकृत सदस्य** |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | बालाणी भगतराम रावलमल | सोनवणे कैलास नारायण |
| सोनवणे धिरज मुरलीधर | अत्तरदे रजनी प्रकाश | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| काळे दिपमाला मनोज | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | आहुजा मनोज नारायणदास | चौधरी महेश रतन |
| भोईटे लताबाई रणजीत | पाटील मिनाक्षी गोकुळ | जैन भागचंद मोतीलाल |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, चौधरी मनोज सुरेश, पाटील चंद्रशेखर शिवाजी, कापसे प्रतिभा चंद्रकांत, कोल्हे सिंधु विजय व बेंडाळे उज्वला मोहन यांचे रजेचे अर्ज आलेले असून ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

नगरसचिव विषय क्र.१) दि.११/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

श्री.भगतराम बालाणी :- महासभा विषय क्रं.१८ दि.११/१०/२०१८ हा पारीत झाला असून तो प्रत्येक प्रभाग समिती निहाय निवीदा प्रसिध्द करावी असे असून त्या ऐवजी संपूर्ण शहराकरीता एक मुस्त पध्दतीने निवीदा काढावी अशी दुरुती करावी तसेच महासभा ठराव क्रं.२२ दि.११/१०/२०१८ पारीत झाला यामध्ये महासभा ठरावाचा उल्लेख नाही तरी महासभा ठराव क्रं.७८९ दि.१६/११/२०१७ अशी दुरुस्ती करुन इतिवृत्त कायम करण्यात यावे.

श्री.नितीन लढढा :- तांत्रिक दुरुस्ती अपेक्षित आहे. धोरणात्मक निर्णय मांडणेबाबत दुरुस्ती करता येत नाही. तीन महिन्यात दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्यामुळे आमचा विरोध आहे. विषय क्र.२० ठराव क्र.२३ समितीबाबत गाळयांचे मुल्यांकन दुरुस्ती बाबत मनपा अधिनियम ३१ अन्वये समिती गठीत करतांना पक्षांचे प्रतिनिधीत्व घेणे आवश्यक आहे. कलम ३० अन्वये मान्यता पक्षांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेता शिवसेना / एमआयएम यांना स्थान दिलेले नाही. त्यामुळे बेकायदेशीर आहे.

श्री.अनंत जोशी :- जवळपास दोन महिने झालेले आहे. याबाबत समितीने किती बैठका घेतल्या याबाबत माहिती द्यावी.

श्री.कैलास सोनवणे :- ३० मार्च २०१६ श्री.जितेंद्र मुंदडा यांना स्विकृत सदस्य म्हणुन दि.२१/०४/२०१६ ला मंजुरी होती. त्यांनी मानधन घेतले. ते परत भरुन घ्यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा विषय क्रं.१८ दि.११/१०/२०१८ हा पारीत झाला असून तो प्रत्येक प्रभाग समिती निहाय निवीदा प्रसिध्द करावी असे असून त्या ऐवजी संपूर्ण शहराकरीता एक मुस्त पध्दतीने निवीदा काढावी अशी दुरुती करावी तसेच महासभा ठराव क्रं.२२ दि.११/१०/२०१८ पारीत झाला यामध्ये महासभा ठरावाचा उल्लेख नाही तरी महासभा ठराव क्रं.७८९ दि.१६/११/२०१७ अशी दुरुस्ती करुन दि.११/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- बालाणी भगतराम रावलमल

अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु

नगरसचिव विषय क्र.२) स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत शहरातील उघडयावर शौचास जाणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम करीता १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचे शिफारसीनुसार प्राप्त अनुदानातुन रु.५०००/- प्रती शौचालय प्रमाणे अनुदान वितरण करणेस व येणाऱ्या रक्कम रु.१,६७,२५,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सदाशिव ढेकळे :- माझे प्रभागातील शौचालय जिर्ण झालेले आहे. सद्या त्यांची ६४ इतकी संख्या आहे. ते तोडुन त्या ठिकाणी नव्याने शौचालय बांधल्यास १२० सिट्स होतील.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत शहरातील उघडयावर शौचास जाणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम करीता १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचे शिफारसीनुसार व त्यासाठी प्राप्त झालेल्या अनुदानातुन महासभा ठराव क्र.३८४ दि.२०/०२/२०१६, ठराव क्र.४१८ दि.३०/०३/२०१६ व ठराव क्र.६४० दि.२९/०४/२०१७ च्या मंजुरीन्वये अनुक्रमे १४५७+११५४+३९६६ अशा एकुण ६५७७ पात्र लाभार्थीना रु.५०००/- प्रती शौचालया प्रमाणे १४व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतुन रु.३,२८,८५,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी प्रदान करणेत आलेली आहे.

वैयक्तीक शौचालय बांधकाम अनुदानास पात्र ठरलेल्या एकुण ६५७७ लाभार्थी पैकी एकुण ६१८८ लाभार्थीयांना रु.५०००/- प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे त्यास एकुण रु.३,०९,४०,०००/- इतका खर्च आलेला आहे.

म.प्रधान सचिव नगर विकास विभाग यांचेकडील बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार जनगणना २०११ चे सर्वेक्षणामध्ये जळगांव शहरात उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटूंबांची संख्या ९९२२ इतकी असुन कुटूंबांना वैयक्तीक शौचालय अनुदानाचा लाभ देण्याचे ठरले आहे. त्यानुसार आज पावेतो वैयक्तीक शौचालय बांधकाम अनुदानास पात्र ठरलेल्या एकुण ६५७७ लाभार्थी कुटूंबांना अनुदान वितरीत करणेकामी उपरोक्त ठरावान्वये म.महासभेने मान्यता दिलेली आहे.

प्रशासनाने प्रस्तावीत केलेप्रमाणे वैयक्तीक शौचालय बांधकाम अनुदानास पात्र उर्वरीत ३३४५ लाभार्थी कुटूंबांना १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन रु.५०००/- प्रती कुटुंब प्रमाणे एकुण रु.१,६७,२५,०००/- मात्र वितरणाच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/ निर्देश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- ढेकळ सदाशिव गणपत

अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव

नगरसचिव विषय क्र.३) सन २०१८-१९ करीता शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी अंदाजपत्रकिय लेखाशिर्षाखाली वाढीव रु.१.५० कोटी मात्रच्या रकमेची तरतुद करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- कश्या प्रकारे निर्बीजीकरण करणार आहे. याबाबत माहिती द्यावी.

श्री.उदय पाटील :- शहरात १५ ते २० हजार मोकाट कुत्रे आहे. त्यांना स्थलांतर करणे किंवा मारु नये याबाबत कोर्टाचे आदेश आहे. निर्बीजीकरणासाठी रु.१००० – रु.१२०० पर्यंत खर्च आहे. निविदा प्रसिध्द केल्या होत्या. त्यावेळेस बजेटची तरतुद नव्हती. भोपाळ येथील संस्थेशी बोलने झालेले आहे.त्यानुसार कार्यवाही करणार आहे.

श्री.सचिन पाटील :- कॉन्ट्रक्टबेसवर पशु वैद्यकीय अधिकारी असावा अशी सुचना आहे. निविदा प्रसिध्द होणार आहे. प्रशासनाने प्रॉपर चॅनलने जावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरामध्ये अंदाजे १५००० ते २०००० हजार मोकाट भटके कुत्रे आहेत. सदर मोकाट व भटके कुत्रे अंगावर धावून येणे, चावा घेणे या समस्यांनी उग्र स्वरुप धारण केलेले आहे. त्यामुळे शहरातील काही भागातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले असून जनतेला अनेक प्रकारच्या त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत दैनिक वृत्तपत्रातून वारंवार बातम्या देखील प्रसिध्द होत आहेत. मे.सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार कुत्रे मारणे अथवा स्थलांतर करणेस मनाई करण्यात आलेली आहे. भटक्या व मोकाट कुत्र्यांची उत्पत्ती थांबवून त्यांची जन्म संख्येवर नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) रुल्स २००१ नुसार निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे.

सदर कुत्र्यांना पकडणे करीता म.न.पा.शेल्टर, डॉगव्हॅन, प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग तसेच निर्बीजीकरण शस्त्रक्रियासाठी लागणारे पशु वैदयकीय अधिकारी, परिचर, सहाय्यक, आधुनिक साहित्य, औषधी, अमबुलन्स व दवाखाना इ.व्यवस्था उपलब्ध करणे तसेच कुत्र्यांवर निर्बीजीकरण प्रक्रिया केलेनंतर ७ दिवस डॉक्टरांच्या नियंत्रणात ठेवून उपचार करणे, खनपान व्यवस्था करणे व शस्त्रक्रिया झालेनंतर पुर्ववत ठिकाणी सोडणे इत्यादी करीता मनपाकडे कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नाहीत.

ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) यांची मान्यता असलेल्या नोंदणीकृत व अनुभवी संस्थेकडून प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ अन्वये शहरातील कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये फक्त रु.२५ लक्ष रक्कमेची बजेट मध्ये तरतूद करण्यात आलेली होती. परंतू सदरची तरतूद अत्यंत कमी असल्यामुळे ८ वेळा ई-निविदा प्रसिध्द करुन देखील निविदेस कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. पिसाळलेले व रोगट कुत्र्यांचा बंदोबस्त करावयाचा झाल्यास कारवाई करणेपुर्वी पशुवैदयकीय अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर कारवाई अपेक्षीत आहे. तथापी म.न.पा.आस्थापना सुचिवर पशु वैदयकीय अधिकारी हे पद नसल्यामुळे कामकाजात मोठया प्रमाणावर अडथळा निर्माण होत आहे.

भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड (AWBI) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार चेन्नई यांचेकडील पत्र दि.२८/०५/२०१० नुसार रु.४४५ प्रती कुत्र्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया राबविणेसाठी ५०% खर्च अनुदानपोटी काम पुर्ण झालेनंतर (AWBI) कडून दिला जाईल व उर्वरित ५०% खर्च स्थानिक संस्थेने करावा असे सुचित केलेले आहे. सदर योजनेसाठी शहरातील किमान १५,००० कुत्र्यांची संख्या गृहित धरता रु.४४५/- प्रमाणे रु.६६.७५ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. तथापी कुत्र्यांवर निर्बीजीकरण करणे कामी इतर महानगरपलिकांकडून माहिती घेतली असता प्रती डॉग सरासरी रु.१२००/- खर्च येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे शहरातील मोकाट/भटक्या कुत्र्यांची संख्या विचारात घेता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षा करीता किमान रु.१.५० कोटी तरतूद करणे आवश्यक आहे.

प्रशासनाने प्रस्तावित केलेनुसार शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे कामी सन २०१८-१९ मध्ये केलेली तरतूद रु.२५ लक्ष वजा जाता रु.१.२५ कोटी जादा रक्कमेची अशी एकूण १.५० कोटी तरतूद दुरुस्ती अंदाजपत्रकात करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/ निर्देश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पाटील सचिन भिमराव

अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव

नगरसचिव विषय क्र.४) आव्हाणे शिवार गट नं.८६४ येथील बंद पडलेला हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांनी प्रकल्पाची केलेला करार (संविदा) रद्द करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.दिलीप पोकळे :- प्रस्ताव रद्द करण्यात यावा. मनपाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

श्री.नितिन लढ्ढा :- राज्य शासनाचे प्रस्तावानुसार मान्यता घेऊन कार्यवाही करावी.

श्री.उदय पाटील:- १ लाख मेटरीक टन कचरा पडुन आहे. नाशिक येथिल कंपनीने दिला होता प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. श्री. धोंडे साहेबांकडे बोलने झाले. तीन कोटेशन मागविणे आवश्यक होते.

श्री.नितीन लढ्ढा :- विषयाला योग्य पाठपुरावा केला जात नाही. जानेवारी २०१७ मध्ये तरतुद केली आहे. ११ महिने झाले. सभागृहात झालेल्या निर्णयाचा पाठपुरावा करावा. ठराव चुकीचा असेल तर याबाबत पुढील सभेत निदर्शनास आणावे. विखंडनामध्ये वेळ जातो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी नियम २०००) नुसार म.न.पा हद्दीतील निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे कामी BOT तत्वावर प्रकल्प उभारुन कार्यान्वीत करणेसाठी फेर जाहिर निविदा सुचनेव्दारे निविदा मागविल्या असता घनकचरा व्यवस्थापन कायदा २००० चे अंमलबजावणी करणेचे कामी स्थायी समिती ठराव क्र.२६२ दि.२०/०१/२००७ नुसार हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रस्तावास ३० वर्षे कालावधीकरीता बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर काम देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने सदर प्रकल्पधारकांस करारनामा करुन दिलेल्या कार्यादेशानुसार प्रकल्प जुन २०१० मध्ये सुरु होवून साधारणपणे प्रकल्प ३ वर्षापर्यंत सुरळीत सुरु होता. तद्नंतर जुन २०१३ मध्ये प्रकल्पधारकांचे कोणत्याही प्रकारे म.न.पा.स पुर्ण सुचना न देता परस्पर बंद केलेला प्रकल्प सुरु करणेबाबत म.न.पा.तर्फे वेळोवेळी नोटीस देवून देखील प्रकल्पधारक यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणी प्रकल्पधारकाशी झालेल्या करारनाम्यानुसार प्रकल्प बंद पडल्यास त्याची पुढील कारवाई करणेसाठी प्रकल्पासंबंधी अंतिम न्याय निवाडयाचे अधिकार लवादक म्हणून मा.आयुक्त यांना असल्याने करारनाम्यातील अट क्रं.९ नुसार दि.२७/०५/२०१५ रोजी मा.आयुक्त यांचेकडेस सुनावणी कामी बोलविण्यात आले होते. त्या दिवशी प्रकल्पधारक उपस्थित नव्हते. तद्नंतर तयांना मुदतवाढ देवून दि.१८/०६/२०१५ रोजी बोलविण्यात आले होते. त्या दिवशी सुध्दा हजर राहिलेले नाही. महणून करारनामा अट क्रं.९ नुसार मा.आयुक्त यांनी लवादक म्हणून या नात्याने आयुक्तांनी घेतलेला निर्णय अंतिम राहिल असे कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार मा.आयुक्त यांनी लवादक म्हणून कामकाज पाहून त्यात दि.०६/०२/२०१७ रोजी अंतिम निर्णय देवून मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांचेकडून रु.१०,५३,६९,६००/- वसूली बाबतचा न्याय निवाडा होवून प्रकल्प आहे त्या स्थितीत दि.१४/१२/२०१६ रोजी पंचनामा करुन ताब्यात घेण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रकल्पधारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२ (१) अन्वये दि.२८/०६/२०१७ रोजी मागणी बिलाची अंतिम नोटीस देण्यात आलेली होती. त्या आदेशाचे विरुध्द मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केलेले असून ते प्रलंबीत आहे. तेव्हांपासून आज पावेतो प्रकल्प बंद आहे.

घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ नुसार शासनाने निर्गमीत केलेल्या आदेशानुसार नविन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून त्यास शासनाची मान्यता प्रदान झालेली आहे. त्याची तात्काळ अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याने बंद असलेल्या प्रकल्पाचे ठिकाणी नव्याने घनकचरा प्रकल्प सुरु करणे बाबतची कार्यवाही करणे अत्यंत

गरजेचे असून त्याची कार्यवाही करणे करीता तेथील जुने बांधकाम पाडून नव्याने आधुनिक यंत्रणेसह प्रकल्प सुरु करणे आवश्यक आहे. त्या करीता पुढील कार्यवाही करणे करीता म.न.पा.चे विधी कायदे सल्लागार यांचे अभिप्राय मागविले असता प्रथम मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांचेशी झालेला नोंदणीकृत करारनाम्यानुसार जागा ताब्यात देण्यात आलेली होती. सदरचा करारनामा रद्द करणे बाबत दि.१४/११/२०१८ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

प्रशासनाने प्रस्तावित केलेनुसार वरील सर्व बाबींचा विचार करता मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांचेशी झालेला नोंदणीकृत करारनामा रद्द करणेची त्वरीत कार्यवाही करावी व नव्याने प्रकल्प उभारणी कामी नव्याने जाहिर ई-निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/ निर्देश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- सनकत चेतन गणेश

नगरसचिव विषय क्र.५) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरासाठी स्टार रेटींग नामांकन प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर हागणदारीमुक्त करणे, शहर स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. जळगांव शहर हागणदारीमुक्त घोषीत करण्यात आलेले असून शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करुन शहर स्वच्छ करणे आवश्यक आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्ये भाग घेतलेल्या सर्व महानगरपालिकांनी सन २०१९ च्या स्पर्धेमध्ये भाग घेणे बंधनकारक असून स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ अंमलबजावणी कामी स्टार रेटींग व हागणदारीमुक्त यास संयुक्तीपणे १२५० गुण प्रस्तावीत आहे. शासनाकडून सर्व महानगरपलिकांचे सन २०१९ मध्ये नियुक्त संस्थेव्दारे शहराची स्टार रेटींगची तपासणी / मुल्यांकन करणेत येणार असून केलेल्या तपासणीच्या आधारे शहराला स्टार रेटींगचे नामांकन प्राप्त होणार आहे. त्यामुळे मा.आयुक्त व मा.महापौर यांचे संयुक्त मान्यतेने जळगांव शहराचा स्टार रेटींग बाबतचा प्रस्ताव म.राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना सादर करणे क्रमप्राप्त आहे.

प्रशासनाने प्रस्तावात नमूद केलेनुसार जळगांव शहरामध्ये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत Garbage Free City Protocol च्या अनुषंगाने २ स्टार रेटींग नामांकनाचे उद्दिष्ट प्राप्त केलेले असून याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/ निर्देश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन

अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश

नगरसचिव विषय क्र.६) घनकचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी करीता म.न.पा.हद्दीतील नागरीकांकडुन सेवा शुल्क वसुल करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितिन लढढा :- करयोग्यमुल्यावर ४ व २ टक्के आकारणी करतो. सामान्य नागरिकावर भार टाकणे योग्य होणार नाही. सुविधा दिलेनंतर व प्रकल्प सुरु झालेनंतर निर्णय घ्यावा.

श्री.भगतराम बालाणी :- शासनाच्या सुचना आहेत.

श्री.उदय पाटील :- डि.पी.आर.शासनाने मंजुर केलेला आहे. नागरीकांकडुन वसुल करणे आवश्यक आहे. स्लम भागातुन / शहरी/कमर्शियल भागातुन किती वसुली करावी याबाबत निर्देश आहे. हा खर्च सन २०१९-२० साठी आहे. सभागृहाने याबाबत विचार करावा.

श्री.नितिन लढ्ढा :- नागरीकांना प्रथम सुविधा दया महिनाभर गटारी साफ होत नाही. सेनेचा विरोध आहे करवाढ करु नका.

श्री.रिजवान बागवान :- एम.आय.एम.चा विरोध आहे.करवाढ करु नये

श्री.विशाल त्रिपाठी :- डि.पी.आर. कधी मंजुर झाला याची माहिती द्यावी.

श्री. उदय पाटील :- मार्च २०१८ मध्ये मान्यता दिलेली आहे. म.न.पा.ने ठराव पारित करुन पाठविला होता.

श्री.अनंत जोशी :- लहान गल्यामध्ये वाहन जात नाही बचत गटांना देणार होते.

श्री.उदय पाटील :- तेथिल कचरा जमाकरुन संकलीत करावा असा तसेच डीपीआर मंजुर आहे नविन भाग घेतला आहे.

श्री.विशाल त्रिपाठी :- प्रशासनाचा विषयाचा अभ्यास नसतो डॉकेट अपुर्ण असते सदस्यांना अभ्यास असतो याची खंत वाटते मा.आयुक्तांना विनंती गती दयावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्या अन्वये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प विस्तृत अहवालाची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी शासनाने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रु.३०.९६ कोटी साठी मंजुरी प्रदान केलेली आहे. संबंधीत सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये स्वच्छ भारत अभियान धर्तीवर घनकचरा व्यवस्थापना प्रमाणे स्वच्छता ठेवणेसाठी विविध प्रकारच्या उपायोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पानुसार शहरातील नागरीकांना सेवा पुरविण्यासाठी सेवा शुल्क आकारणी केल्यास घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची शाश्वतता टिकविता येईल. करीता सन २०१९-२०या आर्थिक वर्षापासुन मालमत्ता कराच्या वार्षिक बिलातुन करयोग्यमुल्यावर घरगुती प्रयोजनार्थ २% व वाणिज्य वापराकरीता ४% या प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन या शिर्षाखाली सेवा शुल्क वसुल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

बहुमताने मंजुर

अनुकूल मते :- ५२ प्रतिकुल मते :- १५

सूचक :- सनकत चेतन गणेश

अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत

नगरसचिव विषय क्र.७) संजय प्रभाकर सांळुखे (बडतर्फ मजूर) यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात येवून त्यांची सेवा समाप्त करण्यात आल्याच्या प्रकरणाबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.धिरज सोनवणे :- हत्येच्या चौकशी मध्ये भुसावळ येथे बोलविले होते बडतर्फ का करु नये ३ दिवसांचा कालावधी दिला मात्र एक तासात निलंबीत केले.

नगर सचिव :- घटनाक्रम वाचुन दाखविला

मा.आयुक्त :- बडतर्फ करता येत नाही पुढचा प्रश्न

श्री.कैलास सोनवणे :- आरोपी नव्हते तरी निलंबीत का केले याबाबत माहिती दयावी.

आयुक्त :- त्यावेळचे परिस्थिती बाबत भाष्य करता येणार नाही निलंबीत करता येते बडतर्फ नाही.जे रेकार्डला आहे ते मी सांगतो.

कैलास सोनवणे :- चुकीचे सांगत आहे शिंदे उत्तर दयावे

आयुक्त :- मी बोलतो आहे त्यामुळे अधिकारी बोलणार नाही त्यावेळेस त्या आयुक्तांनी निर्णय घेतला.

कैलास सोनवणे :- तेच मी सांगत आहे त्यांना चौकशी साठी बोलावले गुन्हा नोंद नाही नोटीस दिली चौकशी लावली एकवेतनवाढ बंद केली त्यानंतर तांत्रिक कारणास्तव आरोपी झाले त्यावेळेस निलंबीत केले हे बरोबर आहे त्यानंतर त्यांनी कामावर घेणेचा अर्ज दिला सबंधीतांनी अर्ज दिला टिपणी लिहिली त्यानंतर खोसे यांनी सांगीतले सेवा पुस्तक मागविले कामावर घेणेचा निकाल होता.शिंदे खोसे यांचा अभिप्राय वाचुन दाखविणे.शिंदे तुला आदेश दिलेला आहे वाचन करावे.

श्री.शिंदे :- वाचन केले

श्री.कैलास सोनवणे :- कामावर घेणे बाबतचा अर्ज होता.

मा.आयुक्त :- बडतर्फ करणेसाठी विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे

कैलास सोनवणे :- कामावर घेणे बाबत निकाल होता त्यांनी बडतर्फ बाबत आदेश मत दिले हे योग्य आहे का.

मा.आयुक्त :- खोसे उत्तर दया.

श्री.खोसे :- आदेशार्थ सादर केले आहे तत्कालीन आयुक्तांनी बडतर्फ बाबत सांगितले होते आयुक्त अधिकारी आहेत.

कैलास सोनवणे :- चुक तुमची आहे आयुक्तांचे निदर्शनास आणणे आवश्यक होते.

श्री.भगतराम बालाणी :- प्रस्ताव अमान्य

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत असून श्री. संजय प्रभाकर सांळुखे यांनी आपल्या अपिल अर्जात नमूद केलेनुसार श्री.सांळुखे हे गेल्या २०/२५ वर्षापासून तत्कालीन नगरपालिका व आता महानगरपालिकेत सेवा बजावत असतांना, कोणत्याही कर्मचाऱ्यावर माझ्यामुळे प्रतिकुल परिणाम होईल असे वर्तन माझ्याकडून कधीही झालेले नाही किंवा संस्थेत मी नियमितपणे सेवा बजावत आहे. तसेच माझे वर्तनही कधीही गुन्हेगारी स्वरुपाचे नसतांना माझ्यावर सामाजिक वैमनस्यावरुन खोटा गुन्हा दाखल झाला होता त्यानंतर मी न्यायालयीन निर्णय केस नं.२११/२०१२ निकाल दि.३०/०५/२०१७ नुसार मी निर्दोष ठरलेलो असल्याने माझ्यावरील झालेला अन्याय दुर करावा असा अपिल अर्ज दिलेला असून त्याचा विचार करता श्री.सांळुखे यांचेवर त्यांचे कुटूंबाची जबाबदारी असल्याने नैसर्गीक न्यायतत्वानुसार श्री. संजय प्रभाकर सांळुखे यांना मनपा सेवेत कामावर घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने ठरावानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे कैलास नारायण

अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक

नगरसचिव विषय क्र.८) IHSDP योजने अंतर्गत घरकुले वाटप करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- ५३० संख्या आहे किंवा ५४० आहे किती नक्की घ्यावे ५४० लाभार्थींचे नावे आहेत

श्री.डी.एस.खडके :- काही ठिकाणी मंदिर,मस्जिद,दर्गा आहे.५४० पैकी २५२ दिले असुन २८८ बाकी

श्री.नितीन लढढा :- ७१ लाभार्थी शिल्लक आहे त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली

श्री.ईबा पटेल :- घरे कमी आहेत मागणी जास्त आहे.

श्री.नितीन लढढा :- मेहरुणचे घरकुल आहेत जागा मालक वाढीव मोबदला मिळावा म्हणुन कोर्टात गेला त्याला ३.५ कोटी रुपये देण्यात आले आजही त्या जागेवर मालकाचा बऱ्याच जागेवर कब्जा आहे.आपण सभा संपलेनंतर कृपया पहावे तेथे म्हशी बांधलेल्या आहेत एकीकडे आपण निधी आणतो आपले प्रभागात कामे कमी करतो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, IHSDP योजने अंतर्गत ७६ घरकुले वाटप करणे संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या अहवालाचे वाचन करण्यात येऊन सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाच्या अहवालात नमुद बाबींशी सभागृह सहमत आहे. तथापी प्रशासनाच्या अहवालात दुध फेडरेशन जवळील ५३० झोपडीधारकांना ताबा पावती दिल्याचे नमुद आहे. मात्र माहिती अधिकारात पुरविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे ५४० झोपडी धारकांचे स्थलांतर करण्यात आल्याची बाब सभागृहात निदर्शनास आणुन देण्यात आले असल्याने प्रशासनाने एकुण झोपडी धारक ५४० असल्याची खात्री करावी व त्यानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

IHSDP योजने अंतर्गत मंजुर झालेले ४७२ लाभार्थी यादीतील यापुर्वी वाटप झालेले २५२ लाभार्थी यादीतील नावे वगळुन उर्वरीत सर्व लाभार्थीचे यादीतुन ७६ घरकुलांचा लकी ड्रॉ काढण्यास व त्यानुसार घरकुल वाटप करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच ७६ घरकुलाचे वाटप झाल्यानंतर उर्वरीत सर्व झोपडी धारकांकडुन प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांची नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात नमुद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यते करीता पाठविण्यात मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

नगरसचिव विषय क्र.९) वृक्ष प्राधिकरणाची पुर्न स्थापना करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.विष्णु भंगाळे :- वृक्ष अधिकारी असावा कश्या पध्दतीने लावावे हे सुध्दा पाहावे व अधिकारी आणावा

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव पर्यावरण विभागाकडील कामकाज मा.वृक्ष प्राधिकरण समितीच्या संल्लग्नतेने सुरु असते. तरी राज्य निवडणुक आयोग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.३१/क.५ दि.२५/०६/२०१८ अन्वये बुधवार, दि.०१ ऑगस्ट २०१८ रोजी सार्वत्रिक निवडणुक घेण्यात आलेली असुन, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र.३५, सोमवार ६ ऑगस्ट २०१८ अनुसार महानगरपालिकेच्या १९ बहुसदस्यीय प्रभागांमध्ये निवडुन आलेल्या एकुण ७५ सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र ) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ०३ अनुसार सदर नवनिर्वाचित सदस्यांमधुन कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींचे मिळुन एक वृक्ष प्राधिकरण घटित करणे आवश्यकअसल्याने वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये खालील नमूद सदस्यांचा समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | कोल्हे प्रविण रामदास |
| २ | बाविस्कर किशोर रमेश |
| ३ | नेरकर सरिता अनंत |
| ४ | सोनवणे सुरेश माणिक |
| ५ | काळे दिपमाला मनोज |
| ६ | सोनार रंजना विजय |
| ७ | पाटील चंद्रशेखर शिवाजी |
| ८ | लढढा नितीन बालमुकूंद |
| ९ | बरडे नितीन मनोहर |
| १० | नाईक प्रशांत सुरेश |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- काळे अमित पांडुरंग**

**अनुमोदक :- आहुजा मनोज नारायणदास**

नगरसचिव विषय क्र.१०) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव शहर हगणदारी मुक्तीचा दर्जा शाश्वतरित्या टिकविण्याबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत शहर हागणदारीमुक्त करण्यात येवुन संदर्भ क्र. १ शासन परिपत्रकानुसार जळगांव शहर दि.२७/०९/२०१७ रोजी महाराष्ट्र शासन नियुक्त समितीव्दारे हागणदारीमुक्त घोषित करण्यात आलेला असुन हागणदारीमुक्त शहराचा दर्जा शाश्वतरित्या राखण्यात आलेला आहे.

भारत सरकार नियुक्त एजन्सी QCI (Quility Council of India) मार्फत दि.०९/०१/२०१८ रोजी जळगांव शहर ODF म्हणजेच हागणदारीमुक्त घोषीत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे QCI मार्फत दि.०८/०९/२०१८ रोजी शहर हागणदारीमुक्त असल्याचे प्रमाणित (ODF Recertification) करण्यात आलेले आहे.

सन २०११ च्या जनगणेनेनुसार जळगांव शहरातील ९९२२ कुटुंबांना शौचालयाची सुविधा नसल्यामुळे वैयक्तीक शौचालयाचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. त्यानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त निधीतुन ६५२० लाभार्थींचे वैयक्तीक शौचालय बांधकाम पुर्ण करण्यात आलेले असुन माहे ऑक्टोंबर २०१८ अखे शौचालय सर्व्हेक्षण करण्यात येवुन त्याबाबतचा अहवाल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | वार्ड क्रं. | एकूण मालमत्ता | एकूण वैयक्तीक शौचालय | एकूण सेप्टीक टॅंक | वैयक्तीक शौचालय नसलेल्या कुटूंबांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ते ३७ | ९९३६१ | ९५९५९ | ९५९५९ | ३४०२ |

| अ.क्र. | वार्ड क्रं. | सामुदायीक व सार्वजनिक शौचालय | वारकर्त्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ ते ३७ | ११७ ब्लॉक (२१६६ सिट्स) | ९५९५९ |

आज रोजी शहरामध्ये ९७% वैयक्तीक शौचालय उपलब्ध असून उर्वरित ११७ सामुदायीक शौचालयाच्या ठिकाणी एकूण २१६६ सिट्स असून त्यामध्ये पाणी, लाईट, सेप्टीक टॅंक इ.सोईसह देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली असून सर्व सिट्स सुव्यवस्थेत असून नागरीक त्यांचा वापर करीत आहेत.

गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील संदर्भ क्रं.२ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार जळगांव शहर हागणदारीमुक्त ODF प्रमाणित करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००
सूचक :- ढेकळे सदाशिवराव गणपतराव
अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

नगरसचिव विषय क्र.११) पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) यश इंजिनियरींग कंस्लटन्टस प्रा.लि.औरंगाबाद यांच्या नेमणुकीच्या निविदा इसारा अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्रचे परतावा करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) नेमणुकी कामी निविदा सुचना प्रसिध्द केलेली होती. त्याअनुषंगाने सदर कामी यश इंजिनियरींग कंस्लटन्टस प्रा.लि.औरंगाबाद यांनी पावती क्रं.९९४४ दि.१२/०१/२०१२ नुसार रक्कम रु.५०,०००/- मात्र निविदा इसारा अनामत मनपात भरणा केलेला असून यास ०३ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला असलेने यश इंजिनियरींग कंस्लटन्टस प्रा.लि.औरंगाबाद यांना अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्र परतावा करणेस महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम १९० (४) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००
सूचक :- सोनवणे मुकुंदा भागवत
अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास

नगरसचिव विषय क्र.१२) पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) प्राय मुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंस्लटन्ट प्रा.लि.पुणे यांच्या नेमणुकीच्या निविदा इसारा अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्रचे परतावा करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) नेमणुकी कामी निविदा सुचना प्रसिध्द केलेली होती. त्याअनुषंगाने सदर कामी प्राय मुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंस्लटन्ट प्रा.लि.पुणे यांनी पावती क्रं.९९४३ दि.१२/०१/२०१२ नुसार रक्कम रु.५०,०००/- मात्र निविदा इसारा अनामत मनपात भरणा केलेला असून यास ०३ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला असलेने प्राय मुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंस्लटन्ट प्रा.लि.पुणे यांना अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्र परतावा करणेस महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम १९० (४) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे मुकुंदा भागवत**
**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

नगरसचिव विषय क्र.१३) पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) फॉरट्रीज ईन्फ्रास्ट्रक्चर अन्ड अडव्हायझरी, मुंबई यांच्या नेमणुकीच्या निविदा इसारा अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्रचे परतावा करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) नेमणुकी कामी निविदा सुचना प्रसिध्द केलेली होती. त्याअनुषंगाने सदर कामी फॉरट्रीज ईन्फ्रास्ट्रक्चर अन्ड अडव्हायझरी, मुंबई यांनी पावती क्रं.९९४१ दि.१२/०१/२०१२ नुसार रक्कम रु.५०,०००/- मात्र निविदा इसारा अनामत मनपात भरणा केलेला असून यास ०३ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला

असलेने फॉरट्रीज ईन्फ्रास्ट्रक्चर अन्ड अडव्हायझरी, मुंबई यांना अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्र परतावा करणेस महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम १९० (४) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे मुकुंदा भागवत

अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास

नगरसचिव विषय क्र.१४) पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) डी.आर.ए.कन्सल्टंट प्रा.लि.,नागपुर यांच्या नेमणुकीच्या निविदा इसारा अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्रचे परतावा करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पाणी पुरवठा मलनि:सारण प्रकल्प मोठी उद्याने विकसित करणेकामी प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (Transaction Advisor) नेमणुकी कामी निविदा सुचना प्रसिध्द केलेली होती. त्याअनुषंगाने सदर कामी डी.आर.ए. कन्सल्टंट प्रा.लि.,नागपुर यांनी पावती क्रं.९९४२ दि.१२/०१/२०१२ नुसार रक्कम रु.५०,०००/- मात्र निविदा इसारा अनामत मनपात भरणा केलेला असून यास ०३ वर्षा पेक्षा अधिक कालावधी झालेला असलेने डी.आर.ए. कन्सल्टंट प्रा.लि.,नागपुर यांना अनामत रक्कम रु.५०,०००/- मात्र परतावा करणेस महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम १९० (४) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे मुकुंदा भागवत

अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास

नगरसचिव विषय क्र.१५) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये मौजे मेहरुण स.नं.१९५/१ब + २अ या जमिनीतुन जाणाऱ्या १५.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव अमान्य करणेत येत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता भूसंपादनापोटी आर्थिक मोबदला जमिन मालकास अदा न करता टी.डी.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- कोल्हे ललित विजय**

नगरसचिव विषय क्र.१६) जळगांव शहरातील सि.स.नं.२३७५ ची जागा पोलिस विभागाने विनामोबदला त्यांचे नावावर करुन देणेबाबत दिलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदरची जागा पोलीस अधिक्षक जळगांव यांच्या नावावर विनामुल्य करता येणार नाही. आजपोवतो भाडे मागावे तसेच बदल्यात मुल्यांकनानुसार पोलीस खात्याची जमीन देणे विषयी कळविणेत यावे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- खडके सुनिल वामनराव

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

नगरसचिव विषय क्र.१७) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये मौजे जळगांव शिवार स.नं.३३७/३ब/१, ३३७/३ब/२, ३३७/३ब/३, ३३७/३ब/४ या जमिनीवर आरक्षण क्र.०५ 'प्राथमिक शाळा' व 'क्रिडांगण' करीता भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये संपादीत करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.कैलास सोनवणे :- मागील दिनांक ११/१०/२०१८ रोजी झालेल्या महासभेमध्ये जोडपत्र विषय क्रं.१ अन्वये स्वतंत्र विषय आला होता व सभागृहातील सभासदांना अभ्यास करण्यास वेळ मिळावा म्हणून या सभागृहापुढे पुनश्च ठेवण्यात आलेला आहे असे दिसते. सदर विषयाचा सविस्तर अभ्यास करता पुढील बाबी दिसून येतात.

१. दिनांक ३०/०६/१९९५ रोजी तत्कालीन नगरपालिका ठराव क्रं.३६ अन्वये जळगाव ३३७ पैकी या जमिनीवरील मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.४ सिविक सेंटर, आरक्षण क्र.५ प्राथमिक शाळा व प्ले ग्राऊंड या करीता आरक्षीत असून महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये खाजगी वाटाघाटीने रक्कम रुपये प्रती एकरी ३ लाख प्रमाणे संपादन करण्यास मान्यता देण्यात आली व सदर जमिनीतील विहीरीचे मुल्यांकन जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्ररित्या करुन त्याचा वेगळा मोबदला देण्यात यावा येणे प्रमाणे सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

२. ठरावानुसार

अ) ३३७/३ब/१ क्षेत्र ३७ आर. मालक अनिल एकनाथ कोल्हे

ब) ३३७/३ब/२ क्षेत्र ३७ आर. मालक चंद्रकांत एकनाथ कोल्हे

क) ३३७/३ब/३ क्षेत्र ३७ आर. मालक संजय एकनाथ कोल्हे

ड) ३३७/३ब/४ क्षेत्र ३६ आर. मालक सुजय एकनाथ कोल्हे

येणे प्रमाणेच्या चारही जमिनींचा ताबा दिनांक २४/०७/१९९५ रोजी तत्कालीन नगरपालिकेस जमिनी ताब्यात देऊन योग्य त्या स्टँप पेपरवर करुन दिलेली असून सदर ताबा पावती राजपत्रित नगररचनाकार, राजपत्रित शासकीय अधिकारी यांचे समक्ष देण्यात आलेला आहे व ठरावात नमुद केल्याप्रमाणे प्रति एकरी ३ लाख रुपये प्रमाणे मोबदला देण्याच्या अटीवर ताबा देण्यात आलेला आहे.

३. दिनांक २४/०७/१९९५ च्या अकाउंट विभागात सादर केलेल्या बिलानुसार
   - अ) ३३७/३ब/१ क्षेत्र ३७ आर. मालक अनिल एकनाथ कोल्हे यांना अलाहाबाद बँक चेक नं.९६०७१ रक्कम रुपये २,७७,५००/-
   - ब) ३३७/३ब/२ क्षेत्र ३७ आर. मालक चंद्रकांत एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७२ रक्कम रुपये २,७७,५००/-
   - क) ३३७/३ब/३ क्षेत्र ३७ आर. मालक संजय एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७३ रक्कम रुपये२,७७,५००/-
   - ड) ३३७/३ब/४ क्षेत्र ३६ आर. मालक सुजय एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७४ रक्कम रुपये २,७०,०००/-

   येणे प्रमाणे दि.२४/०८/१९९५ रोजी हमिन मालकांच्या विनंती अर्जावरुन रकमा अदा करण्यात आल्या व चेक वटवले गेले. यावरुन अकाउंट विभागात खात्री केलेली आहे व चेक वटलेले आहेत. म्हणजे विहीरीच्या मुल्यांकन अदा करण्या व्यतिरीक्त जमिन मालक व नगरपालिका यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे घेणे-देणे राहीलेले नाही. (अर्ज उपलब्ध आहेत व अर्जावर जमिनय मालकांच्या स्वाक्षरी आहेत.)

४. साबताबरा उताऱ्यावर नाम कायम करण्यासाठी दिनांक १७/०५/१९९६ रोजी नगरपालिकेतर्फे अर्ज करण्यात आला व सातबारा उताऱ्यावर नावे दाखल करण्याकामी शहर जळगाव तलाठी कार्यालयात नोंद क्र.२२९४९ अन्वये ताबा पावती आधारे नोंद करण्यात आली व सातबारा उताऱ्यावर पेन्सीलने दिनांक २३/०५/१९९६ रोजी नोंद घेण्यात आली. सदर नोंदीवर मंडल अधिकारी यांनी दिनांक १४/०६/१९९६, १०/०७/१९९६, १५/०५/१९९७, २१/०८/१९९८, २९/०९/१९९८ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या. मात्र तत्कालीन तलाठी, मंडलाधिकारी, जमिन मालक व प्रशासनातील अधिकारी यांच्या संगनमताने एकाही नोटीसीचे उत्तर देण्यात आलेले नाही. सरतेशेवटी दिनांक २६/०१/१९९९ रोजी तत्कालीन मंडलाधिकारी जळगांव यांनी जळगांव नगरपालिकेच्या ययनावे लागलेली जमिन नगरपालिकेचे नाव सातबारा उताऱ्यावरुन कमी करुन जमिन पुनश्च कोल्हे बंधुच्या नावावर केली.

   सदर सातबारा उताऱ्यावरील नाव कमी होण्याच्या कृतीला तत्कालीन अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे अपील केलेले नाही.

५. तत्कालीन नगरपालिकेच्या दिनांक १२/१०/१९९६ रोजी ठराव क्र.१८६ अन्वये जळगाव स.नं.३३७ पैकी आरक्षण क्र.४,५ व १५ मीटर रुंद रस्ता येणे प्रमाणेची जागा खजगी वाटाघाटीने संपादन केलेने त्यास आलेला खर्च रक्कम रुपये ११,०२,५००/- वर नियमाप्रमाणे शासनाकडून अनुदान मागणीचा प्रस्ताव सुरु करणेबाबतचा निर्णय झाला. सदर जागा खाजगी वाटाघाटीने संपादन केलेली आहे हे हयावरुन स्पष्ट होत आहे. (कूठेही म्हटले नाही अडव्हास आहे पूर्णच रक्कम दिली आहे.)

६. दिनांक ११/०७/२००५ रोजी जमिन मालक यांचेकडून रिट याचिका दाखल करण्यात आली. त्याची नोंदणी दिनांक १६/०१/२००६ रोजी होऊन त्यास रिट याचिका क्र.२८७/२००६ दाखल झाली. त्यानुसार जमिन मालकांनी उच्च न्यायालयात असे नमुद केले की, आम्ही फक्त अडव्हांस घेतलेला आहे आणि जमिन ताब्यात दिलेली आहे. भुसंपादन कायदयाप्रमाणे आमच्या जमिनीची अदयाप प्रक्रिया झालेली नाही, जमिनीवर घरकुलांचे बांधकामही झालेले आहे व आम्हास संपुर्ण मोबदला मिळालेला नाही. सबब जमिनीची भुसंपादन प्रक्रिया करुन आम्हास जमिनीचा मोबदला मिळावा तसेच रक्कम अदा करणार नसल्यास घरकुले पाडून जमिनीचा रिकामा कब्जा देण्यात दयावा. येणे प्रमाणे कोर्टात विनंती केली.

७. सदर रिट याचिकेचे कामकाज दिनांक २२/०२/२००८ रोजी झले. त्यावेळी महापालिकेतर्फे विधीज्ञ श्री.प्रदीप आर.पाटील हे हजर झाले. त्यांनी कोर्टामध्ये दिलेल्या निवेदनानुसार याचिकाकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुदयांची तिव्रता बघता आम्ही याचिका कर्त्याच्या मागणीप्रमाणे आवश्यक पावले उचलून भुसंपादनाची प्रक्रिया राबवून कोणत्याही प्रकारचा विलंब न करता मोबदला अदा करण्याच्या कारवाई करु, असे वक्तव्यावरुन कोर्टाने याचिका निकाली काढून आठ आठवडयांमध्ये आवश्यक कारवाई करावी, असे आदेश पारीत केले.

   **अशा प्रकारेचे वक्तव्य करण्यापुर्वी अड.पी.आर.पाटील यांनी महापालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारचा ठराव, मान्यता, अधिकार प्राप्त न करुन घेता याचिकाकर्त्यास फायदा व्हावा हया हेवुने स्वत:च्या अधिकारात जे त्यांना कोणत्याही कायदयाने प्राप्त नाही. अनाधिकाराने वक्तव्य करुन मनपावर खोटी अदायगी थोपलेली आहे. मनपातील विधी शाखेमध्ये अभिलेखाची तपासणी केली असता अड.पी.आर.पाटील यांना अधिकार दिल्याचेही आढळून आलेले नाही. यावरुन खुप मोठे संगनमत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.**

८. जमीन मालकाचे वकील नारायण आर.लाठी यांनी दिनांक २२/०२/२००८ रोजी झालेल्या निकालानुसार आठ आठवडयामध्ये भुसंपादनामध्ये कारवाई करुन मोबदला देण्याचे आदेशीत असताना पाच महिने होऊनही कोणतीही कार्यवाही मनपाकडून झालेली दिसून येत नाही. त्यामुळे ना.हायकोर्टाची अवमान्यता झालेली आहे. तरी तातडीने भुसंपादनाची कारवाईचा मोबदला दयावा येणे प्रमाणेची नोटीस दिली. त्यांच्या नोटीसीमध्ये नमुद दिनांक २०/०१/१९९७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता हे नमुद वक्तव्य व प्रकरणात केलेल्या भुसंपादनाच्या कारवाईचा उल्लेख हा त्यांचे पक्षकाराचा नसून लगतच्या दुसऱ्या जमीन मालकांचा उल्लेख आहे. यामुळे वकीलांचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसून येत आहे. (हे संदर्भ त्यांचे नसून श्री.खटोड यांचे मॅटरचे आहे.)

९. महापालिकेकडून दिनांक २४/०३/२०११ रोजी सिव्हील ॲप्लीकेशन ७०४९/२०११ अन्वये दिनांक २२/०२/२००८ रोजी झालेल्या निकालामध्ये सिव्हील अप्लीकेशन दाखल करण्यात येऊन मनपाने सदर जमिन खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेतलेली आहे म्हणून २२/०२/२००८ रोजी निकाली काढण्यात आलेल्या याचिकेच्या अंमलबजावणीस मनाई हुकूम मागणी केली. सदर कामी महापालिकेच्या वतीने नगररचनाकार डी.एस.पाटील यांच्या वतीने प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. त्यासोबत विलंब माफीचा अर्ज दिला नसल्याने सिव्हील अप्लीकेशन क्र.८३०२/२०११ अन्वये विलंब माफीचा अर्ज दाखल केला. त्यावर कामकाज होऊन दिनांक १५/०७/२०११ रोजी विलंब माफीचा अर्ज फेटाळताना कोर्टाने आदेशात नमुद केले की, तुम्ही आमच्या समक्ष <u>एक हजार दिवांपेक्षा जास्त दिवसांनी आला आहात.</u> म्हणुन मनपास पाच हजार रुपये दंड ठोठावून विलंब माफीचा अर्ज मान्य करण्यात आला. एक प्रकारे अशा प्रकारचा दंड ठोठावणे अधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे मनपाची नामुष्की आहे. ( ३ वर्षांनी अपील, निश्काळजीपणा)

१०. दिनांक १९/०३/२०११ रोजी मनपा जळगावचे नगररचनाकार यांचेकडून
    १. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
    २. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग

यांना जमिनीमध्ये असलेल्या विहीरीचे मुल्यांकन होऊन मिळणेकामी अर्ज केले.

११. दिनांक १७/०९/२०११ रोजी रिमाइंडर देण्यात आले. मनपातील नगररचना विभागाने मनपातील शहर अभियंता यांना विहीरीचे मुल्यांकन करणेचे पत्र दिले.

१२. दिनांक ११/०४/२०१२ रोजी शहर अभियंता यांनी रक्कम रुपये ७६,६०७/- एवढे विहीरीचे मुल्यांकन निश्चित केले.

१३. दिनांक ०२/०९/२०१० व ०९/०२/२०११ रोजी महापालिकेचे विधीज्ञ प्रदीप आर.पाटील यांनी साव बनून मनपास पत्र व्यवहार केला आहे व रिट याचिका क्र.२८७/२००६ दिनांक २२/०२/२००८ च्या निकालाप्रमाणे भुसंपादनाची कारवाई करुन प्रस्ताव सादर करावा तसेच त्वरीत रकमा जमा कराव्यात. विधीज्ञ पी.आर.पाटील यांनी मनपाशी पत्रव्यवहार करताना दाखवलेली तत्परता व रिव्हयू पिटीशन दाखल करताना केलेला विलंब हे त्यांचे संगनमत दर्शवते.

१४. दिनांक २७ मार्च २०१५ सिव्हील अप्लीकेशन ७०४९/२०११ मध्ये निकाल होऊन सिव्हील अप्लीकेशन रिजेक्ट करण्यात आले व यमनपा व जमिन मालक यांच्यामध्ये आपसी समझोत्याने काही मार्ग निघत असेल याची पडताळणी करण्याची मुभा दिली. (आपसात समझोत होऊन मार्ग निघत असलेतर)

१५. दिनांक १०/०४/२०१५ रोजी जमिन मालकांनी आयुक्तांना पत्र दिले की, कोर्टाच्या निकालाप्रमाणे कारवाई करावी व भुसंपादन प्रक्रिया करुन वाढीव मोबदला यदेण्यात यावा, असे कळविले. सदर कामी कार्यालयीन टिपणी मध्ये सर्व प्रकरणाचा ऊहापोह होऊन नगररचनाकार निकम यांनी सदर प्रकरणी ०१/०७/२०१५ रोजी मंजुर केलेल्या टिपणीनुसार विधी सल्लागार अड.श्रीकांत एस.पाटील (औरंगाबाद) यांचे मत मागवणे योग्य राहील अशी टिपणी केली. त्यानुसार दिनांक ०७/०७/२०१५ रोजी अड.श्रीकांत एस.पाटील यांचे अभिप्राय प्राप्त झाले. त्यांनी सुचित केल्यानुसार जमिन मालकांना जमिनीच्या मोबदल्याच्या बदल्यात टी.डी.आर. देणे विषयीची शक्यता पडताळून पाहण्याचे सुचवण्यात आले. वास्तविकत: जमिन खाजगी वाटाघाटीने संपुर्ण मोबदला देऊन जमिन ताब्यात घेतलेली असताना पुनश्च टी.डी.आर. देण्याचा सल्ला विधीज्ञ यांनी देणे आर्श्चकारक आहे. म्हणजे त्यांच्या सल्ल्यानुसार पैसेही दया आणि टी.डी.आर. पण दया. हा सगळा प्रकार बघता कोणतीतरी अदृश्य शक्ती मनपाचे नुकसान करण्यास कारस्थान करत असेल अशी शक्यता वाटते.

१६. दिनांक ३१/०७/२०१५ रोजी नगररचनाकार मनपा (निकम) यांनी वरील प्रमाणे उच्च न्यायालयाचे विधीज्ञ यांनी ०७/०७/२०१५ रोजी अभिप्राय दिलेले असताना विधीशाखा प्रमुख (ढाके) यांच्याकडून अभिप्राय मागवला. श्री.ढाके यांनी ०५/०८/२०१५ रोजीच्या अभिप्रायानुसार अड.श्रीकांत पाटील यांचे मत अंतीम असल्यामुळे जमिन मालकांना लवकरात लवकर पत्र देऊन उच्च न्यायालयाच्या सुचनेनुसार चर्चेसाठी बोलावुन पुढील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी.

१७. दिनांक २९/१२/२०१५ रोजी तब्बल पाच महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर व जमिन मालकाच्या पत्राचा नऊ महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर जमिन मालकांना तडजोडीसाठी दिनांक ०१/०१/२०१६ रोजी हजर राहण्याचे पत्र दिले. (श्री.श्रीकांत पाटील यांनी मत दिल्यानंतर ७ महिन्यानंतर हजर राहण्याचे पत्र)

१८. प्रकरणात भुसंपादन अधिकारी यांचे दिनांक २३/१२/२०१५ चे पत्र दाखल असून सदर पत्रामध्ये विषय म्हणून उच्च न्यायालयाची रिट याचिका २८७/२००६ हे नमुद असून विषयामध्ये मात्र लगत जमिनीचा संदर्भ दिलेला आहे. यावरुन अदृष्य शक्तींचा प्रभाव जिल्हाधिकारी कार्यालयावरही आहे असे दिसून येते. दिनांक ०१/०१/२०१६ रोजी सर्व जमिन मालक व त्यांचे अडव्होकेट एन.आर.लाठी यांनी सुनावणी वेळी दिलेल्या लेखी खुलाश्यानुसार नवीन भुसंपादन कायदयानुसार संपादीत जमिनीचा दुप्पट टी.डी.आर.देण्यात यावा, मनपा दुप्पट टी.डी.आर. दिल्यास भुसंपादनाचा प्रस्ताव मागे घेण्यास अर्जदाराची संमती राहील. असा लेखी खुलासा सादर केला तसेच सुनावणी वेळी यनगररचनाकार यांनी १) नियमाप्रमाणे टी.डी.आरचा फॉर्म भरुन दयायला तयार आहे का, संरक्षक भिंत बांधण्याचा खर्च देण्यास तयार आहे का, दिनांक २४/०८/१९९५ रोजी आपणास दिलेला मोबदला टी.डी.आर. सर्टिफिकेट निर्गमीत यदेण्याच्या तारखेपर्यंत द.सा.द.शे.२४% रक्कम देण्यास तयार आहे का. जमिन मालकांनी संरक्षक भिंतीची रक्कम भरावयास तयारी दर्शवली मात्र १९९५ पासून आजपावेतो जमिनीचे भाडे व आजपावेतो बाकी असलेली रक्कम याचे व्याज याची रक्कम आपण दत असाल तर आम्हीही व्याजासहीत रक्कम दयावयास तयार आहोत. तरी तातडीने टी.डी.आर देण्यात यावे. येणे प्रमाणे सुनावणी झाली.

१९. दिनांक १०/०३/२०१६ रोजी मंजुर टिपणीनुसार दिनांक ०१/०१/२०१६ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान उपस्थित मुदयांचे विधी सल्लागार यांचे अभिप्राय मागविण्यात यावेत याबाबत संचिका पाठविण्यात आली. दिनांक २१/०३/२०१६ रोजी यावर विधी सल्लागार यांचे मत प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मनपाची परिस्थिती लेने के देणे पड गये अशी स्थिती झाली. ढाके साहेबांनी मनपाच्या रकमेवरील व्याज व जमिन मालकास दयावे लागणारे भुईभाडे याचा फरक ५४ लाख रुपये मनपाचे नुकसान होईल म्हणून पुढील निर्णय घेण्यास सांगितले.

२०. दिनांक ०२/०४/२०१६ रोजीच्या नगररचना विभागाच्या टिप्पणीनुसार सुरुवातीपासुन शेवटपर्यंत खरी सत्यता लिहीण्याचा प्रयत्न केला आहे. (निकम साहेबांची टिपणी वाचणे) या मध्ये सविस्तर वर्णन लिहीलेले आहे. दिनांक ०६/०४/२०१६ रोजी यावर विधी सल्लागार यांचे वरील बेकायदेशीर बाबींचे अनुषंगाने विधी सल्लागार ढाके यांचे दिनांक ११/०४/२०१६ च्या अभिप्रायानुसार झालेला प्रस्ताव प्रकरण बेकायदेशीर स्वरुपाचे असुन सर्व परिस्थिती उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणुन दयावी व उच्च न्ययालयाचे विधी सल्लागाराकडे प्रस्तुत प्रकरण पाठविण्यात यावे. यावर नगररचनाकार निकम यांचे दि.१८/०४/२०१६ च्या टिप्पणीनुसार यासंदर्भात उच्च न्यायालयाचे विधीज्ञ गुणाले तसेच पी.आर. पाटील यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी या प्रकरणी आता हायकोर्टामध्ये कुठलीही याचिका करता येऊ शकत नाही. प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात अपील करणे कामी सुचवले. यावरुन हे स्पष्ट होते की ज्या प्रकरणामध्ये पी.आर.पाटील यांचा स्पष्टरित्या गैरकृत्यात सहभाग आहे. त्या प्रकरणात त्यांच्या कडुन योग्य सल्ला कुठुन मिळेल एवढे थोडे भानही निकमांना आले नाही. रिन्हयु पिटीशन दाखल करता आले असते किंवा पी.आर.पाटील यांनी केलेले वकतव्य मागे घेता आले असते.

२१. दि.१२/११/२०१६ च्या नगररचनाकार यांच्या टिपणीनुसार दि.१८/०४/२०१६ रोजी सुप्रिम कोर्टामध्ये अपील करण्याचे ठराव टिपणी मंजुर असतानाही दिनांक २२/११/२०१६ रोजी पुनश्च सुप्रिम कोर्टामध्ये जाण्याची टिपणी मंजुर केली. पुनश्च नगररचना विभागाच्या निकम यांनी विधी शाखेकडे पाठविले. यावरुन कोणत्याही पध्दतीने येण-केन-प्रकारे कोर्टापुढे जळगांव मनपाची पत जावी व विलंब माफीचा अर्ज मंजुर होऊ नये या हेतुने कृत्य केलेले दिसुन येते.

२२. औरंगाबाद हायकोर्टातील सिव्हील अप्लीकेशन ७०४९/२०११ यामध्ये दि.२७/०३/२०१५ रोजी झालेल्या आदेशा विरुध्द दि.१४/१२/२०१६ रोजी सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे विशेष अनुमती याचिका क्र.४९०३/२०१७ दाखल करण्यात आली. त्यामध्ये दि.१०/०३/२०१७ च्या आदेशानुसार ५९२ दिवसानंतर कोर्टासमोर याचिका दाखल केलेली आहे व विलंबाचे पुरेसे कारणेही दाखल केलेले नाहीत. ह्या विलंबाच्या कारणावर कोणत्याही प्रकारची गुणवत्ता न तपासता याचिका फेटाळण्यात आली सदर प्रकरणाचे अवलोकन करता सर्वोच्च न्यायालयाचे मनपाचे विधीज्ञ यांनी दि.१५/०१/२०१७ च्या पत्रान्वये मनपास कळविले की, आम्ही आपणास दिनांक १०/०८/२०१६ रोजी कोर्टात दाखल करण्याकामी अफेडेव्हिट पाठवले आहे. अदयापपावेतो मनपाकडुन प्रतिज्ञापत्र, वकीलपत्र पाठविण्यात आलेले नाही. तरी तातडीने पाठविण्यात यावे, असे पत्र दिले. यावरुन प्रशासनाचा निष्काळजीपणाचा कहर दिसुन येत आहे.

२३. अवमान याचिका :- दिनांक १९/०१/२०१० रोजी जमिन मालकाकडुन अवमान याचिका क्र.५१/२०१० दाखल करण्यात आली. सदर अवमान याचिकेमध्ये

१. टी.सी.बेंजामिन, सचिव नगरविकास
२. श्री.लांडगे, संचालक नगररचना
३. श्री.सुकळीकर, सहसंचालक नगररचना
४. श्री.रामनाथ सोनवणे, आयुक्त महापालिका

यांना व्यक्तीश: प्रतिवादी करण्यात आले. सदर अवमान याचिका दि.१६/०२/२०१० रोजी नोंदविण्यात येऊन त्यामध्ये दिनांक १२ एप्रिल २०१० रोजी शो-कॉज नोटीस देण्यात आली दिनांक ०७/०६/२०१० रोजीच्या तारखेच्या कामकाजात पी.आर. पाटील यांनी वकीलपत्र दाखल केले मात्र ते स्वत: हजर झाले नाही. सदर कामाकाजामध्ये श्री. सुकळीकर यांनी २१/०३/२०११ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले व महापालिकेच्या वतीने डी.एच. पाटील यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. आयुक्तांच्या वतीने श्री. श्रीकांत एस.पाटील, विधीज्ञ हे ०३/१२/२०१४ रोजी वकीलपत्र दाखल करण्यात आले. सदर अवमान याचिकेचे अवलोकन केले असता, अवमान याचिकेसोबत जोडण्यात आलेले सिनॉपसिस (घटनाक्रम) चे अवलोकन करता घटनाक्रम मधील क्र.३ नुसार दिनांक ०६/०५/२००८ रोजी याचिका कर्त्याने जिल्हाधिकाऱ्यांना अर्ज केला. रिट याचिका क्र.२८७/२००६ अन्वये भुसंपादनाची कारवाई करण्याविषयी कोर्टाने आठ आठवडयात कारवाईचे आदेश दिले आहेत. मनपाने अगोदरच भुसंपादन कायदा कलम ५२(अ) चे आदेश दिले आहेत. तरी भुसंपादनाची कारवाई सुरु करावी असे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या अर्जात नमुद केले आहे. (खोटे आहे.)

क्र.४ नुसार भुसंपादन अधिकाऱ्यांने दि.२८/०५/२००९ च्या पत्रान्वये आम्ही अगोदरच नगरपालिकेस २/३ रकमेचा भरणा करण्याचे पत्र दिले आहे. ते भरणा करत नाहीत म्हणुन भुसंपादनाची कारवाई सुरु होऊ शकत नाही. भुसंपादन कायदा कलम ५२(अ) ची कारवाई अगोदरच सुरु आहे.

अवमान याचिकेमधील सादर केलेले कागदपत्र व वक्तव्याची शहनिशा करता त्यामध्ये नमुद ३,४,५,६ हे संपुर्णत: खोटे बनावट, कोर्टाची दिशाभुल करुन खोटे कागदपत्र सादर करुन खोटे प्रतिज्ञापत्र / व्हेरीफिकेशन सादर करुन कोर्टाची दिशाभुल केलेली आहे. याचिकेस लावलेल्या वरील उल्लेखीत क्र.३ मधील एक्सीबीट-बी नुसार विशेष भुसंपादन अधिकारी यांना दिनांक ०६/०५/२००८ रोजी दिलेल्या अर्जामध्ये नमुद सर्व्हे क्र.३३७/३अ/१,२,३,४ या जमिनींचा उल्लेख असुन सदर जमिनी या कोल्हे यांच्या मालकीच्या नसुन त्या श्रीराम खटोड, आर्किटेक्ट कोल्हे व सुनील खाडे यांच्या मालकीचय असुन कोल्हे बंधुंचा क्रमांक ३३७/३ब/१,२,३,४ असा आहे. म्हणजेच जसे पेशवेकाळात "ध" चा "मा" केला होता तसाच कोल्हे बंधुचे वकील विधीज्ञ, यांनी "३अ" चा "३ब" केला आहे. येणे प्रमाणे शुध्द रित्या कुटील हेतुने कोर्टाची दिशाभुल केलेली आहे.

याचिकेतील एक्सीबीट- सी नुसार भुसंपादन अधिकारी यांनी दिलेले पत्र हे स्पष्टत: दिसुन येत आहे की, विषयामध्ये जळगांव शहर येथील भुसंपदन क्र.७१/२००० असे नमुद असुन सदर प्रस्ताव हा कोल्हे यांच्या जामिनीशी संबंधीत नसुन खटोड यांच्या मालकीच्या जमिनीशी संबंधीत आहे. ५२(अ) चे आदेश खटोड यांच्या जमिनीमध्ये पारीत झालेले असुन कोल्हे यांच्या भुसंपादनाचा प्रस्तावही सुरु झालेले नाही ही वस्तुस्थिती असतांना खटोड यांच्या भुसंपादनाची कागदपत्रे अवमान याचिकेत जोडुन व मनपाची बाजु मांझारे विधीज्ञही संगनमतामध्ये शामील असल्याने सदर बाब कोणीही मे.उच्च न्ययालयाच्या निदर्शनास आणुन दिलेली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयामध्ये मनपाच्या विरुध्द एकतर्फी कार्यवाही झालेली आहे.

२४. दि.१३/०६/२०१४ रोजी जमिन मालकांचे औरंगाबादचे विधीज्ञ अड.अजित काळे यांनी आयुक्त महापालिका यांना अवमान याचिकेची माहिति दिली.

२५. दिनांक २९/०६/२०१८ रोजी औरंगाबाद येथील विधीज्ञ जे अवमान याचिकेचे कामकाज बघत होते त्यांनी अतिमहत्त्वाचे, तातडीचे आयुक्त् यांना पत्र पाठवुन कोर्टात झालेल्या कामाकजाची परिस्थिती कळविली. त्यानुसार दोन आठवडयांनी मे. न्यायाधिशांनी आयुक्तांना समक्ष हजर राहण्यास व खुलासा करण्यास विलंबाच्या कारणासह हजर राहण्यास कळविले. व पॉझिटिव्ह रिप्लाय सह १२/०७/२०१८ रोजी हजर कळविले व न्यायालयाच्या निकालाची प्रतही सादर केली. आयुक्त सो., वास्तवीकता महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४८१ अन्वये मनपास अवगत करुन मान्यता घेणे आवश्यक होते.

२६. दि.०३/०७/२०१८ चे नगररचना विभागाच्या टिपणीनुसार न्यायालयामध्ये वेळोवेळी खरी परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला मात्र न्यायालयाने अर्ज फेटाळला आहे. जमिन मालकाला टीडीआर देण्याची कारवाई केली नाही. उच्च न्यायालयातील विधीज्ञ श्री. श्रीकांत पाटील यांनी दुरध्वनीवरुन दिलेल्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी यांचेकडे भुसंपादनाचा प्रस्ताव तातडीने सादर करावा लागेल. या कामी भुसंपादनाचा प्रस्ताव पाठवावा अगर सुप्रिम कोर्टामध्ये रिव्हयु पिटीशन दाखल करावा. याबाबत उच्च न्यायालयातील विधी सल्लागार यांचे मत घेण्याविषयी दि.०५/०७/२०१८ रोजी आयुक्तांनी टिपणी मंजुर केली आहे.

२७. दिनांक १६/०७/२०१८ चे टिपणीनुसार दि.१२/०७/२०१८ रोजी सुनावणी झाली असुन न्यायालयाने आयुक्तांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र ग्राहय धरुन ज्यामध्ये आम्ही भुसंपादनाची प्रक्रिया सुरु करीत आहोत. (यामध्ये असे नमुद आहे) आज पासुन (१२/०७/२०१८) म्हणजे आज पासुन सहा महिन्यांचे आत म्हणजे १२०१/२०१९ पर्यंत भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करण्योच आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे म.जिल्हाधिकारी व विशेष भुसंपादन अधिकारी जळगांव यांना कळविणे आवश्यक आहे, असे नमुद आहे. मात्र यावर सदर टिपणी आयुक्तांनी मंजुरीची स्वाक्षरी केलेली नाही.

२८. दि.०४/०७/२०१८ रोजी भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविला असुन त्यास भुसंपादन प्रस्ताव क्र.२०१८ लागलेला आहे. त्यास जिल्हाधिकारी यांचे दि.०७/०७/२०१८ व उपजिल्हाधिकारी यांचे ३०/०७/२०१८ अन्वयेचे पत्रानुसार संपादन संस्थेकडुन जमिनीच्या एकुण मोबदल्याच्या ५०% रक्कम रु.१२,३७,१४,०००/- याचा भरणा केल्याशिवाय भुसंपादनाचा प्रस्ताव सुरु होऊ शकत नाही असे कळविले. यावर नगररचनाकार यांनी जमिनीचे मुल्यांकन रु.२४,६८,००,०००/- लाख रुपये न होता रु.१२,४०,००,०००/- एवढी होत असुन त्याच्या ५०% रु.६,२०,००,०००/- यांना दुरुस्ती कळविणे आवश्यक आहे. येणे प्रमाणेची टिपणीस दि.१६/०८/२०१८ रोजी आयुक्तांच्या स्वाक्षरीने मान्य आहे. यावरुन ५०%एवढी रक्कम रु.१२,३७,००,०००/- की सहा कोटी भरावी याचा संभ्रम दुरु झालेला नाही.

२९. म.आयुक्त यांचे दि.१६/१०/२०१८ च्या टिपणीनुसार वरील प्रमाणे खुलासा न होता रु.१२,३७,१४,०००/- या बाबतीत विषय महासभेपुढे सादर करण्याविषयी विनंती करण्यात आली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रस्ताव अमान्य करणेत येत आहे. मागील दिनांक ११/१०/२०१८ रोजी झालेल्या महासभेमध्ये जोडपत्र विषय क्रं.१ अन्वये स्वतंत्र विषय आला होता व सभागृहातील सभासदांना अभ्यास करण्यास वेळ मिळावा म्हणून या सभागृहापुढे पुनश्च ठेवण्यात आलेला आहे असे दिसते. सदर विषयाचा सविस्तर अभ्यास करता पुढील बाबी दिसून येतात.

१. दिनांक ३०/०६/१९९५ रोजी तत्कालीन नगरपालिका ठराव क्रं.३६ अन्वये जळगाव ३३७ पैकी या जमिनीवरील मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.४ सिविक सेंटर, आरक्षण क्र.५ प्राथमिक शाळा व प्ले ग्राउंड या करीता आरक्षीत असून महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये खाजगी वाटाघाटीने रक्कम रुपये प्रती एकरी ३ लाख प्रमाणे संपादन करण्यास मान्यता देण्यात आली व सदर जमिनीतील विहीरीचे मुल्यांकन जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्ररित्या करुन त्याचा वेगळा मोबदला देण्यात यावा येणे प्रमाणे सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

२. ठरावानुसार

अ) ३३७/३ब/१ क्षेत्र ३७ आर. मालक अनिल एकनाथ कोल्हे
ब) ३३७/३ब/२ क्षेत्र ३७ आर. मालक चंद्रकांत एकनाथ कोल्हे
क) ३३७/३ब/३ क्षेत्र ३७ आर. मालक संजय एकनाथ कोल्हे
ड) ३३७/३ब/४ क्षेत्र ३६ आर. मालक सुजय एकनाथ कोल्हे

येणे प्रमाणेच्या चारही जमिनींचा ताबा दिनांक २४/०७/१९९५ रोजी तत्कालीन नगरपालिकेस जमिनी ताब्यात देऊन योग्य त्या स्टँप पेपरवर करुन दिलेली असून सदर ताबा पावती राजपत्रित नगररचनाकार, राजपत्रित शासकीय अधिकारी यांचे समक्ष देण्यात आलेला आहे व ठरावात नमुद केल्याप्रमाणे प्रति एकरी ३ लाख रुपये प्रमाणे मोबदला देण्याच्या अटीवर ताबा देण्यात आलेला आहे.

३. दिनांक २४/०७/१९९५ च्या अकाउंट विभागात सादर केलेल्या बिलानुसार

अ) ३३७/३ब/१ क्षेत्र ३७ आर. मालक अनिल एकनाथ कोल्हे यांना अलाहाबाद बँक चेक नं.९६०७१ रक्कम रुपये २,७७,५००/-
ब) ३३७/३ब/२ क्षेत्र ३७ आर. मालक चंद्रकांत एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७२ रक्कम रुपये २,७७,५००/-
क) ३३७/३ब/३ क्षेत्र ३७ आर. मालक संजय एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७३ रक्कम रुपये२,७७,५००/-
ढ) ३३७/३ब/४ क्षेत्र ३६ आर. मालक सुजय एकनाथ कोल्हे अलाहाबाद बँक चेक नं.९६०७४ रक्कम रुपये २,७०,०००/-

येणे प्रमाणे दि.२४/०८/१९९५ रोजी जमिन मालकांच्या विनंती अर्जावरुन रकमा अदा करण्यात आल्या व चेक वटवले गेले. यावरुन अकाउंट विभागात खात्री केलेली आहे व चेक वटलेले आहेत. म्हणजे विहीरीच्या मुल्यांकन अदा करण्या व्यतिरीक्त जमिन मालक व नगरपालिका यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे घेणे-देणे राहीलेले नाही. (अर्ज उपलब्ध आहेत व अर्जावर जमिनय मालकांच्या स्वाक्षरी आहेत.)

४. सातबारा उताऱ्यावर नाव कायम करण्यासाठी दिनांक १७/०५/१९९६ रोजी नगरपालिकेतर्फे अर्ज करण्यात आला व सातबारा उताऱ्यावर नावे दाखल करण्याकामी शहर जळगाव तलाठी कार्यालयात नोंद क्र.२२९४९ अन्वये ताबा पावती आधारे नोंद करण्यात आली व सातबारा उताऱ्यावर पेन्सीलने दिनांक २३/०५/१९९६ रोजी नोंद घेण्यात आली. सदर नोंदीवर मंडल अधिकारी यांनी दिनांक १४/०६/१९९६, १०/०७/१९९६, १५/०५/१९९७, २१/०८/१९९८, २९/०९/१९९८ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या. मात्र तत्कालीन तलाठी, मंडलाधिकारी, जमिन मालक व प्रशासनातील अधिकारी यांच्या संगनमताने एकाही नोटीसीचे उत्तर देण्यात आलेले नाही. सरतेशेवटी दिनांक २६/०१/१९९९ रोजी तत्कालीन मंडलाधिकारी जळगांव यांनी जळगांव नगरपालिकेच्या नावे लागलेली जमिन नगरपालिकेचे नाव सातबारा उताऱ्यावरुन कमी करुन जमिन पुनश्च कोल्हे बंधुच्या नावावर केली.
सदर सातबारा उताऱ्यावरील नाव कमी होण्याच्या कृतीला तत्कालीन अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे अपील केलेले नाही.

५. तत्कालीन नगरपालिकेच्या दिनांक १२/१०/१९९६ रोजी ठराव क्र.१८६ अन्वये जळगाव स.नं.३३७ पैकी आरक्षण क्र.४,५ व १५ मीटर रुंद रस्ता येणे प्रमाणेची जागा खजगी वाटाघाटीने संपादन केलेने त्यास आलेला खर्च रक्कम रुपये ११,०२,५००/- वर नियमाप्रमाणे शासनाकडून अनुदान मागणीचा प्रस्ताव सुरु करणेबाबतचा निर्णय झाला. सदर जागा खाजगी वाटाघाटीने संपादन केलेली आहे हे हयावरुन स्पष्ट होत आहे. (कूठेही म्हटले नाही अडव्हास आहे पूर्णच रक्कम दिली आहे.)

६. दिनांक ११/०७/२००५ रोजी जमिन मालक यांचेकडून रिट याचिका दाखल करण्यात आली. त्याची नोंदणी दिनांक १६/०१/२००६ रोजी होऊन त्यास रिट याचिका क्र.२८७/२००६ दाखल झाली. त्यानुसार जमिन मालकांनी उच्च न्यायालयात असे नमुद केले की, आम्ही फक्त अडव्हांस घेतलेला आहे आणि जमिन ताब्यात दिलेली आहे. भुसंपादन कायदयाप्रमाणे आमच्या जमिनीची अदयाप प्रक्रिया झालेली नाही, जमिनीवर घरकुलांचे बांधकामही झालेले आहे व आम्हास संपुर्ण मोबदला मिळालेला नाही. सबब जमिनीची भुसंपादन प्रक्रिया करुन आम्हास जमिनीचा मोबदला मिळावा तसेच रक्कम अदा करणार नसल्यास घरकुले पाडून जमिनीचा रिकामा कब्जा देण्यात दयावा. येणे प्रमाणे कोर्टात विनंती केली.

७. सदर रिट याचिकेचे कामकाज दिनांक २२/०२/२००८ रोजी झले. त्यावेळी महापालिकेतर्फे विधीज्ञ श्री.प्रदीप आर.पाटील हे हजर झाले. त्यांनी कोर्टामध्ये दिलेल्या निवेदनानुसार याचिकाकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुदयांची तिव्रता बघता आम्ही याचिका कर्त्याच्या मागणीप्रमाणे आवश्यक पावले उचलून भुसंपादनाची प्रक्रिया राबवून कोणत्याही प्रकारचा विलंब न करता मोबदला अदा करण्याच्या कारवाई करु, असे वक्तव्यावरुन कोर्टाने याचिका निकाली काढून आठ आठवडयांमध्ये आवश्यक कारवाई करावी, असे आदेश पारीत केले.

**अशा प्रकारेचे वक्तव्य करण्यापुर्वी अड.पी.आर.पाटील यांनी महापालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारचा ठराव, मान्यता, अधिकार प्राप्त न करुन घेता याचिकाकर्त्यास फायदा व्हावा हया हेवुने स्वत:च्या अधिकारात जे त्यांना कोणत्याही कायदयाने प्राप्त नाही. अनाधिकाराने वक्तव्य करुन मनपावर खोटी अदायगी थोपलेली आहे. मनपातील विधी शाखेमध्ये अभिलेखाची तपासणी केली असता अड.पी.आर.पाटील यांना अधिकार दिल्याचेही आढळून आलेले नाही. यावरुन खुप मोठे संगनमत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.**

८. जमीन मालकाचे वकील नारायण आर.लाठी यांनी दिनांक २२/०२/२००८ रोजी झालेल्या निकालानुसार आठ आठवडयामध्ये भुसंपादनामध्ये कारवाई करुन मोबदला देण्याचे आदेशीत असताना पाच महिने होऊनही कोणतीही कार्यवाही मनपाकडून झालेली दिसून येत नाही. त्यामुळे ना.हायकोर्टाची अवमान्यता झालेली आहे. तरी तातडीने भुसंपादनाची कारवाईचा मोबदला दयावा येणे प्रमाणेची नोटीस दिली. त्यांच्या नोटीसीमध्ये नमुद दिनांक २०/०१/१९९७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता हे नमुद वक्तव्य व प्रकरणात केलेल्या भुसंपादनाच्या कारवाईचा उल्लेख हा त्यांचे पक्षकाराचा नसून लगतच्या दुसऱ्या जमीन मालकांचा उल्लेख आहे. यामुळे वकीलांचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसून येत आहे. (हे संदर्भ त्यांचे नसून श्री.खटोड यांचे मॅटरचे आहे.)

९. महापालिकेकडून दिनांक २४/०३/२०११ रोजी सिव्हील ऍप्लीकेशन ७०४९/२०११ अन्वये दिनांक २२/०२/२००८ रोजी झालेल्या निकालामध्ये सिव्हील अप्लीकेशन दाखल करण्यात येऊन मनपाने सदर जमिन खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेतलेली आहे म्हणून २२/०२/२००८ रोजी निकाली काढण्यात आलेल्या याचिकेच्या अंमलबजावणीस मनाई हुकूम मागणी केली. सदर कामी महापालिकेच्या वतीने नगररचनाकार डी.एस.पाटील यांच्या वतीने प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. त्यासोबत विलंब माफीचा अर्ज दिला नसल्याने सिव्हील अप्लीकेशन क्र.८३०२/२०११ अन्वये विलंब माफीचा अर्ज दाखल केला. त्यावर कामकाज होऊन दिनांक १५/०७/२०११ रोजी विलंब माफीचा अर्ज फेटाळताना कोर्टाने आदेशात नमुद केले की, तुम्ही आमच्या समक्ष <u>एक हजार दिवांपेक्षा जास्त दिवसांनी आला आहात.</u> म्हणुन मनपास पाच हजार रुपये दंड ठोठावून विलंब

माफीचा अर्ज मान्य करण्यात आला. एक प्रकारे अशा प्रकारचा दंड ठोठावणे अधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे मनपाची नामुष्की आहे. ( ३ वर्षांनी अपील, निश्काळजीपणा)

१०. दिनांक १९/०३/२०११ रोजी मनपा जळगावचे नगररचनाकार यांचेकडून
 १. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
 २. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग
 यांना जमिनीमध्ये असलेल्या विहीरीचे मुल्यांकन होऊन मिळणेकामी अर्ज केले.

११. दिनांक १७/०९/२०११ रोजी रिमाइंडर देण्यात आले. मनपातील नगररचना विभागाने मनपातील शहर अभियंता यांना विहीरीचे मुल्यांकन करणेचे पत्र दिले.

१२. दिनांक ११/०४/२०१२ रोजी शहर अभियंता यांनी रक्कम रुपये ७६,६०७/- एवढे विहीरीचे मुल्यांकन निश्चित केले.

१३. दिनांक ०२/०९/२०१० व ०९/०२/२०११ रोजी महापालिकेचे विधीज्ञ प्रदीप आर.पाटील यांनी साव बनून मनपास पत्र व्यवहार केला आहे व रिट याचिका क्र.२८७/२००६ दिनांक २२/०२/२००८ च्या निकालाप्रमाणे भुसंपादनाची कारवाई करुन प्रस्ताव सादर करावा तसेच त्वरीत रकमा जमा कराव्यात. विधीज्ञ पी.आर.पाटील यांनी मनपाशी पत्रव्यवहार करताना दाखवलेली तत्परता व रिव्हयू पिटीशन दाखल करताना केलेला विलंब हे त्यांचे संगनमत दर्शवते.

१४. दिनांक २७ मार्च २०१५ सिव्हील अप्लीकेशन ७०४९/२०११ मध्ये निकाल होऊन सिव्हील अप्लीकेशन रिजेक्ट करण्यात आले व मनपा व जमिन मालक यांच्यामध्ये आपसी समझोत्याने काही मार्ग निघत असेल याची पडताळणी करण्याची मुभा दिली. (आपसात समझोत होऊन मार्ग निघत असलेतर)

१५. दिनांक १०/०४/२०१५ रोजी जमिन मालकांनी आयुक्तांना पत्र दिले की, कोर्टाच्या निकालाप्रमाणे कारवाई करावी व भुसंपादन प्रक्रिया करुन वाढीव मोबदला यदेण्यात यावा, असे कळविले. सदर कामी कार्यालयीन टिपणी मध्ये सर्व प्रकरणाचा ऊहापोह होऊन नगररचनाकार निकम यांनी सदर प्रकरणी ०१/०७/२०१५ रोजी मंजुर केलेल्या टिपणीनुसार विधी सल्लागार अड.श्रीकांत एस.पाटील (औरंगाबाद) यांचे मत मागवणे योग्य राहील अशी टिपणी केली. त्यानुसार दिनांक ०७/०७/२०१५ रोजी अड.श्रीकांत एस.पाटील यांचे अभिप्राय प्राप्त झाले. त्यांनी सुचित केल्यानुसार जमिन मालकांना जमिनीच्या मोबदल्याच्या बदल्यात टी.डी.आर. देणे विषयीची शक्यता पडताळून पाहण्याचे सुचवण्यात आले. वास्तविकत: जमिन खाजगी वाटाघाटीने संपुर्ण मोबदला देऊन जमिन ताब्यात घेतलेली असताना पुनश्च टी.डी.आर. देण्याचा सल्ला विधीज्ञ यांनी देणे आर्श्चकारक आहे. म्हणजे त्यांच्या सल्ल्यानुसार पैसेही दया आणि टी.डी.आर. पण दया. हा सगळा प्रकार बघता कोणतीतरी अदृश्य शक्ती मनपाचे नुकसान करण्यास कारस्थान करत असेल अशी शक्यता वाटते.

१६. दिनांक ३१/०७/२०१५ रोजी नगररचनाकार मनपा (निकम) यांनी वरील प्रमाणे उच्च न्यायालयाचे विधीज्ञ यांनी ०७/०७/२०१५ रोजी अभिप्राय दिलेले असताना विधीशाखा प्रमुख (ढाके) यांच्याकडून अभिप्राय मागवला. श्री.ढाके यांनी ०५/०८/२०१५ रोजीच्या अभिप्रायानुसार अड.श्रीकांत पाटील यांचे मत अंतीम असल्यामुळे जमिन मालकांना लवकरात लवकर पत्र देऊन उच्च न्यायालयाच्या सुचनेनुसार चर्चेसाठी बोलावुन पुढील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी.

१७. दिनांक २९/१२/२०१५ रोजी तब्बल पाच महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर व जमिन मालकाच्या पत्राचा नऊ महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर जमिन मालकांना तडजोडीसाठी दिनांक ०१/०१/२०१६ रोजी हजर राहण्याचे पत्र दिले. (श्री.श्रीकांत पाटील यांनी मत दिल्यानंतर ७ महिन्यानंतर हजर राहण्याचे पत्र)

१८. प्रकरणात भुसंपादन अधिकारी यांचे दिनांक २३/१२/२०१५ चे पत्र दाखल असून सदर पत्रामध्ये विषय म्हणून उच्च न्यायालयाची रिट याचिका २८७/२००६ हे नमुद असून विषयामध्ये मात्र लगत जमिनीचा संदर्भ दिलेला आहे. यावरुन अदृष्य शक्तींचा प्रभाव जिल्हाधिकारी कार्यालयावरही आहे असे दिसून येते. दिनांक ०१/०१/२०१६ रोजी सर्व जमिन मालक व त्यांचे अडव्होकेट एन.आर.लाठी यांनी सुनावणी वेळी दिलेल्या लेखी खुलाश्यानुसार नवीन भुसंपादन कायदयानुसार संपादीत जमिनीचा दुप्पट टी.डी.आर.देण्यात यावा, मनपा दुप्पट टी.डी.आर. दिल्यास भुसंपादनाचा प्रस्ताव मागे घेण्यास अर्जदाराची संमती राहील. असा लेखी खुलासा सादर केला तसेच सुनावणी वेळी यनगररचनाकार यांनी १) नियमाप्रमाणे टी.डी.आरचा फॉर्म भरुन दयायला तयार आहे का, संरक्षक भिंत बांधण्याचा खर्च देण्यास तयार आहे का, दिनांक २४/०८/१९९५ रोजी आपणास दिलेला मोबदला टी.डी.आर. सर्टिफिकेट निर्गमीत देण्याच्या तारखेपर्यंत द.सा.द.शे.२४% रक्कम देण्यास तयार आहे का. जमिन मालकांनी संरक्षक भिंतीची रक्कम भरावयास तयारी दर्शवली मात्र १९९५ पासून आजपावेतो जमिनीचे भाडे व आजपावेतो बाकी असलेली रक्कम याचे व्याज याची रक्कम आपण दत असाल तर आम्हीही व्याजासहीत रक्कम दयावयास तयार आहोत. तरी तातडीने टी.डी.आर देण्यात यावे. येणे प्रमाणे सुनावणी झाली.

१९. दिनांक १०/०३/२०१६ रोजी मंजुर टिपणीनुसार दिनांक ०१/०१/२०१६ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान उपस्थित मुदयांचे विधी सल्लागार यांचे अभिप्राय मागविण्यात यावेत याबाबत संचिका पाठविण्यात आली. दिनांक २१/०३/२०१६ रोजी यावर विधी सल्लागार यांचे मत प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मनपाची परिस्थिती लेने के देणे पड गये अशी स्थिती झाली. ढाके साहेबांनी मनपाच्या रकमेवरील व्याज व जमिन मालकास दयावे लागणारे भुईभाडे याचा फरक ५४ लाख रुपये मनपाचे नुकसान होईल म्हणून पुढील निर्णय घेण्यास सांगितले.

२०. दिनांक ०२/०४/२०१६ रोजीच्या नगररचना विभागाच्या टिप्पणीनुसार सुरुवातीपासुन शेवटपर्यंत खरी सत्यता लिहीण्याचा प्रयत्न केला आहे. या मध्ये सविस्तर वर्णन लिहीलेले आहे. दिनांक ०६/०४/२०१६ रोजी यावर विधी सल्लागार यांचे वरील बेकायदेशीर बाबींचे अनुषंगाने विधी सल्लागार ढाके यांचे दिनांक ११/०४/२०१६ च्या अभिप्रायानुसार झालेला प्रस्ताव प्रकरण बेकायदेशीर स्वरुपाचे असुन सर्व परिस्थिती उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणुन द्यावी व उच्च न्यायालयाचे विधी सल्लागाराकडे प्रस्तुत प्रकरण पाठविण्यात यावे. यावर नगररचनाकार निकम यांचे दि.१८/०४/२०१६ च्या टिप्पणीनुसार यासंदर्भात उच्च न्यायालयाचे विधीज्ञ गुणाले तसेच पी.आर. पाटील यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी या प्रकरणी आता हायकोर्टामध्ये कुठलीही याचिका करता येऊ शकत नाही. प्रकरणी सर्वोच्च न्यायलयात अपील करणे कामी सुचवले. यावरुन हे स्पष्ट होते की ज्या प्रकरणामध्ये पी.आर.पाटील यांचा स्पष्टरित्या गैरकृत्यात सहभाग आहे. त्या प्रकरणात त्यांच्या कडुन योग्य सल्ला कुठुन मिळेल एवढे थोडे भानही निकमांना आले नाही. रिव्हयु पिटीशन दाखल करता आले असते किंवा पी.आर.पाटील यांनी केलेले वकतव्य मागे घेता आले असते.

२१. दि.१२/११/२०१६ च्या नगररचनाकार यांच्या टिपणीनुसार दि.१८/०४/२०१६ रोजी सुप्रिम कोर्टामध्ये अपील करण्याचे ठराव टिपणी मंजुर असतानाही दिनांक २२/११/२०१६ रोजी पुनश्च सुप्रिम कोर्टामध्ये जाण्याची टिपणी मंजुर केली. पुनश्च नगररचना विभागाच्या निकम यांनी विधी शाखेकडे पाठविले. यावरुन कोणत्याही पध्दतीने येण-केन-प्रकारे कोर्टापुढे जळगांव मनपाची पत जावी व विलंब माफीचा अर्ज मंजुर होऊ नये या हेतुने कृत्य केलेले दिसुन येते.

२२. औरंगाबाद हायकोर्टातील सिव्हील अप्लीकेशन ७०४९/२०११ यामध्ये दि.२७/०३/२०१५ रोजी झालेल्या आदेशा विरुध्द दि.१४/१२/२०१६ रोजी सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे विशेष अनुमती याचिका क्र.४९०३/२०१७ दाखल करण्यात आली. त्यामध्ये दि.१०/०३/२०१७ च्या आदेशानुसार ५९२ दिवसानंतर कोर्टासमोर याचिका दाखल केलेली आहे व विलंबाचे पुरेसे कारणेही दाखल केलेले नाहीत. ह्या विलंबाच्या कारणावर कोणत्याही प्रकारची गुणवत्ता न तपासता याचिका फेटाळण्यात आली सदर प्रकरणाचे अवलोकन करता सर्वोच्च न्यायालयाचे मनपाचे विधीज्ञ यांनी दि.१५/०१/२०१७ च्या पत्रान्वये मनपास कळविले की, आम्ही आपणास दिनांक १०/०८/२०१६ रोजी कोर्टात दाखल करण्याकामी अफेडेव्हिट पाठवले आहे.

अद्यापपावेतो मनपाकडुन प्रतिज्ञापत्र, वकीलपत्र पाठविण्यात आलेले नाही. तरी तातडीने पाठविण्यात यावे, असे पत्र दिले. यावरुन प्रशासनाचा निष्काळजीपणाचा कहर दिसुन येत आहे.

२३. अवमान याचिका :- दिनांक १९/०१/२०१० रोजी जमिन मालकाकडुन अवमान याचिका क्र.५१/२०१० दाखल करण्यात आली. सदर अवमान याचिकेमध्ये

१. टी.सी.बेंजामिन, सचिव नगरविकास
२. श्री.लांडगे, संचालक नगररचना
३. श्री.सुकळीकर, सहसंचालक नगररचना
४. श्री.रामनाथ सोनवणे, आयुक्त महापालिका

यांना व्यक्तीश: प्रतिवादी करण्यात आले. सदर अवमान याचिका दि.१६/०२/२०१० रोजी नोंदविण्यात येऊन त्यामध्ये दिनांक १२ एप्रिल २०१० रोजी शो-कॉज नोटीस देण्यात आली दिनांक ०७/०६/२०१० रोजीच्या तारखेच्या कामकाजात पी.आर. पाटील यांनी वकीलपत्र दाखल केले मात्र ते स्वत: हजर झाले नाही. सदर कामाकाजामध्ये श्री. सुकळीकर यांनी २१/०३/२०११ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले व महापालिकेच्यावतीने डी.एच. पाटील यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. आयुक्तांच्या वतीने श्री. श्रीकांत एस.पाटील, विधीज्ञ हे ०३/१२/२०१४ रोजी वकीलपत्र दाखल करण्यात आले. सदर अवमान याचिकेचे अवलोकन केले असता, अवमान याचिकेसोबत जोडण्यात आलेले सिनॉपसिस (घटनाक्रम) चे अवलोकन करता घटनाक्रम मधील क्र.३ नुसार दिनांक ०६/०५/२००८ रोजी याचिका कर्त्याने जिल्हाधिकाऱ्यांना अर्ज केला. रिट याचिका क्र.२८७/२००६ अन्वये भुसंपादनाची कारवाई करण्याविषयी कोर्टाने आठ आठवडयात कारवाईचे आदेश दिले आहेत. मनपाने अगोदरच भुसंपादन कायदा कलम ५२(अ) चे आदेश दिले आहेत. तरी भुसंपादनाची कारवाई सुरु करावी असे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या अर्जात नमुद केले आहे. (खोटे आहे.)

क्र.४ नुसार भुसंपादन अधिकाऱ्यांने दि.२८/०५/२००९ च्या पत्रान्वये आम्ही अगोदरच नगरपालिकेस २/३ रकमेचा भरणा करण्याचे पत्र दिले आहे. ते भरणा करत नाहीत म्हणुन भुसंपादनाची कारवाई सुरु होऊ शकत नाही. भुसंपादन कायदा कलम ५२(अ) ची कारवाई अगोदरच सुरु आहे.

अवमान याचिकेमधील सादर केलेले कागदपत्र व वक्तव्याची शहनिशा करता त्यामध्ये नमुद ३,४,५,६ हे संपुर्णत: खोटे बनावट, कोर्टाची दिशाभुल करुन खोटे कागदपत्र सादर करुन खोटे प्रतिज्ञापत्र / व्हेरीफिकेशन सादर करुन कोर्टाची दिशाभुल केलेली आहे. याचिकेस लावलेल्या वरील उल्लेखीत क्र.३ मधील एक्सीबीट-बी नुसार विशेष भुसंपादन अधिकारी यांना दिनांक ०६/०५/२००८ रोजी दिलेल्या अर्जामध्ये नमुद सर्व्हे क्र.३३७/३अ/१,२,३,४ या जमिनींचा उल्लेख असुन सदर जमिनी या कोल्हे यांच्या मालकीच्या नसुन त्या श्रीराम खटोड, आर्किटेक्ट कोल्हे व सुनील खाडे यांच्या मालकीचय असुन कोल्हे बंधुंचा क्रमांक ३३७/३ब/१,२,३,४ असा आहे. म्हणजेच जसे पेशवेकाळात "ध" चा "मा" केला होता तसाच कोल्हे बंधुचे वकील विधीज्ञ, यांनी "३अ" चा "३ब" केला आहे. येणे प्रमाणे शुध्द रित्या कुटील हेतुने कोर्टाची दिशाभुल केलेली आहे.

याचिकेतील एक्सीबीट- सी नुसार भुसंपादन अधिकारी यांनी दिलेले पत्र हे स्पष्टत: दिसुन येत आहे की, विषयामध्ये जळगांव शहर येथील भुसंपदन क्र.७१/२००० असे नमुद असुन सदर प्रस्ताव हा कोल्हे यांच्या जामिनीशी संबंधीत नसुन खटोड यांच्या मालकीच्या जमिनीशी संबंधीत आहे. ५२(अ) चे आदेश खटोड यांच्या जमिनीमध्ये पारीत झालेले असुन कोल्हे यांच्या भुसंपादनाचा प्रस्तावही सुरु झालेले नाही ही वस्तुस्थिती असतांना खटोड यांच्या भुसंपादनाची कागदपत्रे अवमान याचिकेत जोडुन व मनपाची बाजु मांडणारे विधीज्ञही संगनमतामध्ये शामील असल्याने सदर बाब कोणीही मे.उच्च न्ययालयाच्या निदर्शनास आणुन दिलेली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयामध्ये मनपाच्या विरुध्द एकतर्फी कार्यवाही झालेली आहे.

२४. दिनांक २९/०६/२०१८ रोजी औरंगाबाद येथील विधीज्ञ जे अवमान याचिकेचे कामकाज बघत होते त्यांनी अतिमहत्वाचे, तातडीचे आयुक्त यांना पत्र पाठवुन कोर्टात झालेल्या कामाकजाची परिस्थिती कळविली. त्यानुसार दोन आठवडयांनी मे. न्यायाधिशांनी आयुक्तांना समक्ष हजर राहण्यास व खुलासा करण्यास विलंबाच्या कारणासह हजर राहण्यास कळविले. व पॉझिटिव्हि रिप्लाय सह १२/०७/२०१८ रोजी हजर कळविले व न्यायालयाच्या निकालाची प्रतही सादर केली. आयुक्त सो., वास्तवीकता महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४८१ अन्वये मनपास अवगत करुन मान्यता घेणे आवश्यक होते.

२५. दि.०३/०७/२०१८ चे नगररचना विभागाच्या टिपणीनुसार न्यायालयामध्ये वेळोवेळी खरी परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला मात्र न्यायालयाने अर्ज फेटाळला आहे. जमिन मालकाला टीडीआर देण्याची कारवाई केली नाही. उच्च न्यायालयातील विधीज्ञ श्री. श्रीकांत पाटील यांनी दुरध्वनीवरुन दिलेल्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी यांचेकडे भुसंपादनाचा प्रस्ताव तातडीने सादर करावा लागेल. या कामी भुसंपादनाचा प्रस्ताव पाठवावा अगर सुप्रिम कोर्टामध्ये रिव्हयु पिटीशन दाखल करावा. याबाबत उच्च न्यायालयातील विधी सल्लागार यांचे मत घेण्याविषयी दि.०५/०७/२०१८ रोजी आयुक्तांनी टिपणी मंजुर केली आहे.

२६. दिनांक १६/०७/२०१८ चे टिपणीनुसार दि.१२/०७/२०१८ रोजी सुनावणी झाली असुन न्यायालयाने आयुक्तांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र ग्राहय धरुन ज्यामध्ये आम्ही भुसंपादनाची प्रक्रिया सुरु करीत आहोत. (यामध्ये असे नमुद आहे) आज पासुन (१२/०७/२०१८) म्हणजे आज पासुन सहा महिन्यांचे आत म्हणजे १२०१/२०१९ पर्यत भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करण्याच आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे म.जिल्हाधिकारी व विशेष भुसंपादन अधिकारी जळगांव यांना कळविणे आवश्यक आहे, असे नमुद आहे. मात्र यावर सदर टिपणी आयुक्तांनी मंजुरीची स्वाक्षरी केलेली नाही.

२७. दि.०४/०७/२०१८ रोजी भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविला असुन त्यास भुसंपादन प्रस्ताव क्र.२०१८ लागलेला आहे. त्यास जिल्हाधिकारी यांचे दि.०७/०७/२०१८ व उपजिल्हाधिकारी यांचे ३०/०७/२०१८ अन्वयेचे पत्रानुसार संपादन संस्थेकडुन जमिनीच्या एकुण मोबदल्याच्या ५०% रक्कम रु.१२,३७,१४,०००/- याचा भरणा केल्याशिवाय भुसंपादनाचा प्रस्ताव सुरु होऊ शकत नाही असे कळविले. यावर नगररचनाकार यांनी जमिनीचे मुल्यांकन रु.२४,६८,००,०००/- लाख रुपये न होता रु.१२,४०,००,०००/- एवढी होत असुन त्याच्या ५०% रु.६,२०,००,०००/- यांना दुरुस्ती कळविणे आवश्यक आहे. येणे प्रमाणेची टिपणीस दि.१६/०८/२०१८ रोजी आयुक्तांच्या स्वाक्षरीने मान्य आहे. यावरुन ५०%एवढी रक्कम रु.१२,३७,००,०००/- की सहा कोटी भरावी याचा संभ्रम दुरु झालेला नाही.

२८. म.आयुक्त यांचे दि.१६/१०/२०१८ च्या टिपणीनुसार वरील प्रमाणे खुलासा न होता रु.१२,३७,१४,०००/- या बाबतीत विषय महासभेपुढे सादर करण्याविषयी विनंती करण्यात आली.

वरील प्रकरणाचा अभ्यास करुन परिस्थिती पाहता योग्य वेळी मनपाची बाजु व्यवस्थितरित्या न मांडल्यामुळे हायकोर्टामध्ये एक रिट पिटीशन, दोन सिव्हील अप्लीकेशन, एक अवमान याचिका, सुप्रिम कोर्टामध्ये विशेष अनुमती याचिका इत्यादी प्रकरणांमध्ये तत्कालीन मनपा अधिकारी व मनपा विधीतज्ञांच्या वतीने कोर्टापुढे योग्यरित्या, योग्य वेळी बाजु न मांडल्यामुळे प्रकरणांमध्ये कोणतेही मुल्यमापन, गुणवत्ता, मेरीट न तपासता तांत्रिक मुद्दयांवर फेटाळण्यात आले आहे.

<u>वास्तविकत:</u> मनपाच्या आर्थिक हितासंबंधात व भुसंपादनाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे वक्तव्य, आश्वासन, हमी महापालिकेच्या वतीने देण्यापुर्वी यास विशेष सभेची, महासभेची मान्यता घेणे आवश्यक

आहे. मात्र सदर प्रकरणामध्ये रिट याचिका क्र.२८७/२००६, दिनांक ११/०७/२००५ पासून आजपावेतो कोणत्याही प्रकारची मान्यता घेतलेली नाही ही बाब संशयास्पद आहे. सदर प्रकरणामध्ये फक्त आणि फक्त खाजगी वाटाघाटीने जमिन संपादनाचा दिनांक ३०/०६/१९९५ रोजी तत्कालीन नगरपालिका ठराव क्र.३६ अन्वये झालेला आहे. या व्यतिरीक्त कोणताही ठराव नाही ही बाब विशेषरित्या नमुद करीत आहोत.

जळगांव शहरामध्ये तत्कालीन नगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने पिंप्राळा येथे मोठया प्रमाणावर जमिनी घेतल्या होत्या व सर्व जमिनी मालकांनी खरेदी खतेही नोंदवून दिली होती. मात्र सदर प्रकरणामध्ये तशी कार्यवाही झालेली नाही व त्या दृष्टीने प्रयत्नही झालेले दिसून आले नाही. अशा प्रकरणात जळगाव दिवाणी न्यायालयात स्पेसिफिक परफॉर्मन्सचा खरेदी मिळणेचा दावा करता आला असता ही वस्तुस्थिती आहे.

सबब सदर बाब ही मनपाच्या आर्थिक हिताशी संबंधीत असल्यामुळे मनपाचे आर्थिक हित हे सर्वोच्च गृहित धरुन यामध्ये दोषी असलेल्यांना शासन व्हावे व झालेल्या आदेशांमध्ये आवश्यक असलेल्या ठिकाणी अपील, पुर्नविचार याचिका, पुर्नविलोकन व पुर्नरीक्षण अर्ज, किरकोळ अर्ज, दिवाणी अर्ज तसेच वेळ प्रसंगी फौजदारी खटले दाखल करणे, यामध्ये दोषी असलेल्या विधीतज्ञांची सनद रद्द करणे संदर्भात कारवाईची आवश्यकता आहे. याकामी प्रशासनाने दोषींवर कारवाई करुन गुन्हे दाखल करावे याकामी अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे प्रशासनातील अधिकारी यांचेकडून त्यांच्याच अधिकाऱ्यांवर कारवाई टाळली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये हे सभागृह १. श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा, २)श्री.कैलास नारायण सोनवणे,३)हॉडा.शुचिता अतुलसिंह व ४) श्री.पोकळे दिलीप बबनराव यांना मनपाकडून दिवाणी कोर्ट, हायकोर्ट, सुप्रिम कोर्ट येथे याचिका दाखल करणे हयाकामी विधीतज्ञ नेमणे, सिनीयर कॉन्सील नेमणूक तसेच फौजदारी दावा व प्रसंगी पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल करणे, वसुली दावे करणे इत्यादीचे अधिकार प्रदान करीत आहे व याकामी होणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात येत आहे.

महासभेचा ठराव नसताना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भुसंपादनाचा प्रस्ताव दाखल करुन घेणे आश्चर्यकारक आहे. सदर बाब जिल्हाधिकारी सो यांना कळविण्यात यावी. प्रशासनाचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी वरिल प्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर

अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव

नगरसचिव विषय क्र.१८) विकास योजना (वा.ह) मौजे जळगांव येथील स.नं.१३० व १३१ मधिल आरक्षण क्रं.१९९ जिल्हा परिषद कर्मचारी निवासस्थानासाठीचे दर्शविलेले आरक्षण रद्द करण्यात येऊन आरक्षण रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदर जागेची महानगरपालिकेस आवश्यकता नसल्याने जिल्हा परिषदेने केलेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन

नगरसचिव विषय क्र.१९) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये मौजे पिंप्राळा गट नं.६१/१ब या जमिनीतुन जाणाऱ्या ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- याप्रकरणी महासभेची परवानगी न घेता प्रस्ताव भुसंपादनाचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविण्याची घाई होते.

श्री.धामणे :- शासनाचे असे आदेश आहे की,महासभेची वाट पहाण्याची आवश्यकता नाही.यास प्रशासन जबाबदार राहिल.

श्री.नितीन लढढा :- यामध्ये आपत्कालीन परिस्थिती असेल तर मनपा.

श्री.धिरज सोनवणे :- अमान्य

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव अमान्य करणेत येत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता भूसंपादनापोटी आर्थिक मोबदला जमिन मालकास अदा न करता टी.डी.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह

नगरसचिव विषय क्र.२०) भुसंपादन प्रस्ताव क्र.५८/०७, ५९/०७, ६०/७ मधील मोबदला रक्कम मिळणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्रीमती.शुचिता हाडा :- मोबदला अदा केल्यास मनपाचे नुकसान होवु शकते सध्या मनपाची आर्थिक स्थिती नाही बहुतांश भागावर माध्यमिक शाळा आहे.आपल्या प्राथमिक शाळा हया आपण दुसऱ्या संस्थेस देत आहोत अश परिस्थितीत मोबदला देणे योग्य होणार नाही.भुसंपादनाची कार्यवाही रदद करावी.व आगाउ रक्कम परत घेणे कामी कार्यवाही करावी.भुसंपादन अधिकारी यांना कळविणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले. प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावानुसार व दिलेल्या माहितीनुसार जेव्हा अभ्यास केला तेव्हा पुढील माहिती प्राप्त झाली. या प्रकरणी भुसंपादन प्रस्ताव क्र.५८/२००७, ५९/२००७, ६०/२००७ शहर जळगांव महानगरपालिका हद्दीतील वाढीव हद्दीच्या विकास योजनेस शासनाने अधिसुचना पत्र क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सि.आर.१४२/युडी ९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केली असुन उक्त विकास योजना दि.०७/०३/२००२ पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेमधील मौजे पिंप्राळा शिवारातील गट नं.९७/३ (भाग), ११०/१/१ (भाग), ११५/४ मधील एकुण २ हेक्टर ५५ आर जमिनीवर बगीचा, प्राथमिक शाळा, क्रिडांगण व माध्यमिक शाळा या वापराकरीता आरक्षण प्रस्तावीत केलेले आहे. सदर आरक्षण कामी महानगरपालिका प्रशासनाने भुसंपादन प्रक्रिया सुरु केली असल्याने भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव यांनी प्रस्तावातील एकुण जमिनीचा अंतीम आकारणी मोबदला जाहीर केला असून, त्या अन्वये भुसंपादनासाठी अदमासे रक्कम रुपये १६ ते १८ कोटी इतक्या निधीची आवश्यकता असेल. मनपा प्रशासनास भुसंपादन अधिकारी यांचे आकारणी व मनपाने आपल्या स्तरावर केलेली आकारणी यात फार मोठी तफावत आढळून आलेली आहे. भुसंपादन अधिकारी यांनी शेत जमिनीला अकृषक दराने आकारणी केलेली असून असे करतांना मोबदला आकारणी वगळावयाच्या आवश्यक रस्ते, खुली जागा, आवश्यक अमेनिटी स्पेस, नाला यांचे क्षेत्र न वगळता संपुर्ण क्षेत्रावर मोबदला देय केलेला आहे. याकामी आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांनी कायदयातील तरतुदीनुसार विहीत मुदतीत भुसंपादन अधिकारी यांच्या आकारणीवर आक्षेप नोंदविला आहे. तसेच विभागीय आयुक्त सो नाशिक यांनी सदर आकारणी / निवाडा पुनश्च पडताळणी करण्याचे लेखी आदेश दि.२३/०२/२०१७ रोजी म.जिल्हाधिकारी सो जळगांव यांना दिलेले असतांनाही अदयाप अंतीम निवाडा दुरुस्त झालेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणी असलेली शेतजमीन ही नाला व्याप्त असून अदयाप या शेतजमिनीपावेतो अप्रोच रस्ता नाही. तसेच नाल्यामुळे जमीन मध्यभागी दुभागलेली असल्याने व प्रत्यक्ष जमीन ही भौगोलिक दृष्टया उंच सखल भाग असल्याने आरक्षण विकसीत होण्याच्या दृष्टीने योग्य नाही. विकास योजनेमध्ये नेमून देणेत आलेले आरक्षण विकसीत करणेसाठी मनपाचे आवाक्याबाहेर खर्च करावा लागेल, ही वस्तुस्थिती आहे.

सदरहू प्रकरणी असा निर्णय घेण्यात येत आहे की, भुसंपादन अधिकारी यांचे आकारणी नुसार मोबदला अदा केला तर महापालिकेचे आर्थिक नुकसान होवू शकते आणि उपरोक्त निवाडा झाल्याप्रमाणे रक्कम अदा करुन भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करावयाची झाल्यास साधारणत: १८ कोटी इतकी रक्कम महापालिकेकडेस असणे आवश्यक आहे. मात्र, महानगरपालिकेकडे भुसंपादन लेखा शिर्षाखाली पुरेसा निधी उपलब्ध नाही. तसेच एकुण जागेपैकी बराच मोठा भाग असलेली जमीन मालकांनी मनपावर एम.आर.टी.पी. अक्टचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना सन २०१३ मध्ये बजावलेली असून सदर कामी आरक्षण व्यपगत होऊन मिळणेसाठी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका प्रलंबीत आहे. तसेच एकुण जमिनीपैकी बहुतांशी भागावर माध्यमिक शाळा आरक्षण आहे. परंतु सदयस्थितीत जळगाव शहर महानगरपालिका आपल्या अखत्यारीतील माध्यमिक शाळा या इतर सामाजिक संस्थांना चालविणेसाठी देत असतांना अवाढव्य रक्कम भुसंपादनासाठी अदा करुन पुन्हा शाळा या प्रयोजनासाठी जागा संपादीत करणे व्यवहार्य व व्यापक जनहिताच्या दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे सदोष आकारणीनुसार मोबदला अदा करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये व जागा मालकावरही अन्याय होऊ नये म्हणून भुसंपादन प्रस्ताव क्र.५८/२००७, ५९/२००७, ६०/२००७ या मधील जमिन विकास योजना आरक्षणातुन वगळण्याची व भुसंपादन प्रक्रियेत माघार घेऊन भुसंपादन प्रस्ताव रद्द करण्याची कार्यवाही मनपा प्रशासनाने विनाविलंब करावी तसेच यापुर्वी निवाडा पुर्ण आगाऊ मोबदला म्हणून विशेष भुसंपादन अधिकारी यांचेकडेस जमा केलेली आगाऊ मोबदला रक्कम रुपये २,०९,४४,४७२/- मात्र ही रक्कम मनपाकडे परत वर्ग करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात मे.जिल्हाधिकारी, भुसंपादन अधिकारी हयांना विनंती करणेत यावी व यासाठी आवश्यक वाटल्यास शहराचे मा.आमदार व मा.पालकमंत्री यांना विनंती करुन सदर रक्कम विनाविलंब मनपाकडे परत मागविण्याची योग्य त्या उपाययोजना कराव्यात. सदरचा निर्णय हा तात्काळ राज्य शासन, म.जिल्हाधिकारी सो.जळगांव व याकामी असलेले मनपा विधीज्ञ यांना तात्काळ अवगत करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर

अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक

नगरसचिव विषय क्र.२१) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, 'प्राथमिक शाळा' व 'क्रिडांगण' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ पैकी या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सुनिल महाजन :- १५/९/२०१८ चा अर्ज आहे इतकी घाई का.

श्री.धामणे :- शासनाचे निर्देशानुसार कार्यवाही केली

श्री.भगतराम बालाणी :- सदर विषय सध्या तहकुब करावा.

मा.आयुक्त :- किती कालावधीसाठी

श्री.नितीन लढढा :- २४ महिन्याचा अवधी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव तहकुब करणेत येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- पोकळे दिलीप बबनराव

अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक

नगरसचिव विषय क्र.२२) रिंगरोड वरील अवजड वाहतुकीस प्रतिबंध करणेबाबत मा.श्री.डॉ.अश्विन शांताराम सोनवणे, उपमहापौर तसेच सन्मा.सदस्या सौ.दिपमाला मनोज काळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
मा.आयुक्त :- क्रास बार टाकावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, रिंगरोड या नावाने ओळखला जाणारा रस्ता हा शहरातील प्रमुख नागरी मार्ग आहे. मात्र या मार्गावर अवजड वाहनांची ये-जा मोठया प्रमाणावर वाढल्याने, नागरी वाहतुकीस अडथळे उत्पन्न होत आहेत तसेच प्रसंगी अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रिंगरोड हा नागरी वस्तीतुन जाणारा प्रमुख मार्ग आहे. या मार्गावर अनेक इस्पितळे असुन, रुग्णवाहक गाडया आणि रुग्ण यांचा या रस्त्यावर मोठया प्रमाणावर वापर आहे. सोबतच काही शाळांकडे जाण्याकामी रिंगरोडचाच उपयोग होतो. अनेक प्रतिष्ठित शैक्षणिक प्रतिष्ठाने/क्लासेस याच मार्गावर आहेत. शालेय तसेच महाविदयालयीन विदयार्थी दुचाकीने याच मार्गावरुन जा-ये करतात. मोटारकार्स, रिक्षा, बाईक यांची या रस्त्यावर मोठी वर्दळ असते.

आणखी महत्वाचे असे की, याच मार्गावर एका बाजुला अमृत योजनेची जलवाहीनी टाकण्याचे काम सध्या सलगपणे रात्रंदिवस सुरु आहे. त्यासाठी जेसीबी यंत्रे लावून खोदकाम करण्यात येत आहे. त्यातच या मार्गावरुन ट्रक, डंपर, ट्रॅक्टर इत्यादी अवजड वाहनांची वाहतुक सुरु असते. बरेचदा वाळु इत्यादी वाहुन नेणारी ट्रॅक्टर्स बेदाकारपणे वेगाने पळवली जात असतात, यामुळे नागरीकांत नाराजी आणि भितीचे वातावरण आहे. करिता रिंगरोड या मार्गावर दोन्ही बाजुस क्रॉसबार लावणेस व अवजड वाहनांना वाहतुक बंदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या बाबींची सत्वर पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००
सूचक :- काळे दिपमाला मनोज
अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर

नगरसचिव जादा विषय क्र.१) जळगांव शहरातील शिवाजी नगर उड्डाण पुलाचे बांधकाम होण्यापुर्वी होणाऱ्या नागरीकांना त्रास त्याकरीता नागरीकांच्या हितासाठी पायी व टु-व्हीलर जाण्याकरीता शिवाजी नगरातील सार्व.शौचालयापासुन ते देवकर निवास पर्यंत रेल्वे गेट बसविणे बाबत सन्मा.सदस्या, सोनवणे कांचन विकास व इतर यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील शिवाजी नगर परिसर एक प्रमुख भाग असुन तेथिल असंख्य नागरीक, गृहीणी, विदयार्थी हे उदयोगधंदा, बाजारहाट, शिक्षण घेणेसाठी शहरात येत असतात तसेच याच परिसरातुन चोपडा, विदगांव, ममुराबाद या गावात जाणे येणेचा रस्ता देखिल मार्गक्रम करीत असुन बहुसंख्य प्रवासी शिवाजी नगर मध्ये उतरुन उड्डाण पुलावरुन शहरात प्रवेश करीत आहे.

सदयस्थितीत सदर उड्डाण पुल निष्कशित करुन नव्याने बांधकाम करण्याचे प्रयोजन असल्याने व त्यामुळे सदर मार्ग बंदावस्थेत राहील परिणामी शिवाजी नगर परिसरातील नागरीकांसह उक्त नमुद गांवकऱ्यांची देखिल गैरसोयीचे ठरणार असुन याला पर्याय म्हणून या परिसरातील नागरीकांनी बऱ्याच वर्षापासुन शिवाजी नगर सार्व.शौचालय ते देवकर निवास पर्यंत पायी जा-ये करणेसाठी लोखंडी जिन्याचा पर्याय रस्ता तयार करुन मिळणेबाबत विनंती केलेली होती.

उपरोक्त नमुद कारणास्तव सन्मा.सदस्या,सोनवणे कांचन विकास सोनवणे, सन्मा.सदस्य श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ, सन्मा.सदस्या,शिंदे गायत्री उत्तम, सन्मा.सदस्य,श्री.बाविस्कर किशोर रमेश तसेच नागरीकांनी सुचविल्या प्रमाणे शिवाजी नगर सार्व.शौचालय ते देवकर निवास पर्यंत रेल्वे गेट लागुन पर्यायी रस्ता तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने यासंबंधी रेल्वे प्रशासना सोबत आवश्यक तो पत्रव्यवहार करणेची व आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००
सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ
अनुमोदक :- सोनवणे कांचन विकास

नगरसचिव जादा विषय क्र.२) महासभा ठराव क्र.१४४२ दि.२३/११/२०१२ रोजी झालेला ठराव रद्द करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.धिरज मुरलीधर सोनवणे यांचे आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.१४४२ दिनांक २३/११/२०१२ रोजी पिंप्राळा शिवार गट नं.१०९/१ पैकी १०९/२ या जमिनीतुन जाणारा विकास योजना रस्ता घेणे संदर्भात झालेला ठराव हा रद्द करण्यात यावा. सदरहु रत्याची जागा

आज रोजी भुसंपादन करुन महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार असुन जो पर्यंत सर्व जमिनधारक आपल्या जमिनी महानगरपालिकेस देत नाही तो पर्यंत रस्त्याचे काम मार्गी लागणार नाही. सदरहू बाब ही न्यायप्रविष्ठ असुन न्यायालयाने सुध्दा मालकाला तोंडी स्वरुपात टी.डी.आर. घेणे विषयी सांगितलेले आहे तसेच आज रोजी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता वरील ठराव रद्द करणेस व त्या अनुषंगाने कोणताही भुसंपादनाचा मोबदला जमिन मालकास अदा न करता टी.डी.आर.देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर

अनुमोदक :- बालाणी भगत रावलमल

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**(भोळे सिमा सुरेश)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**